❖ संस्थापक : कै. वसंत काणे ❖ नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ ❖ पुणे आवृत्ती रविवार, दि. २२ नोव्हेंबर २०२६ ❖ पाने : ८ ❖ अंक : ३२५ ❖ Gmail : news.sandhya@gmail.com ❖ किंमत : ७ रूपये

www.dainikesandhya.com Epaper - www.sandhyaepaper.com www.youtube.com/@sandhyalivenews

७० वर्ष निर्भीड पत्रकारीतेची

दैनिक संध्या

नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक



डेटा सेंटरच्या पाणीपुरवठ्यासाठी एमआयडीसीच्या मालकीची उपकंपनी

प्रस्ताव देण्याची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची सूचना

■ पुणे (दै. संध्या)

'पुणे महानगर परिसरातील उद्योग आणि डेटा केंद्रांच्या पाणीपुरवठ्यासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने पूर्ण मालकीची स्वतंत्र उपकंपनी स्थापन करण्याचा प्रस्ताव तयार करावा. या कंपनीमार्फत नियमित जलस्रोतांसह महानगरपालिकांच्या सांडपाणी प्रक्रिया केंद्रांतील प्रक्रिया केलेले पाणी घेऊन त्याचे वितरण करावे. उपलब्ध प्रक्रिया केंद्रांचे संचालन आणि देखभाल तसेच औद्योगिक पाणीपुरवठा यांची एकत्रित व्यवस्था उभारण्यासाठी आवश्यक धोरणात्मक तरतुदींचा प्रस्ताव सादर करावा,' अशी सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली.

दरम्यान, 'पुणे महानगर प्रदेशातील पाणी मागणी पूर्ण करण्यासाठी मध्य कोकणातील सावित्री नदी परिसरातील पाणी कुकडी, भीमा, इंद्रायणी, मुळा-मुठा आणि नीरा खोऱ्यांकडे वळविण्याच्या नदीजोड पर्यायावरही विचार करावा. त्यासाठी कोकण खोरे ते भीमा खोरे नदी जोड योजना हा चांगला पर्याय होऊ शकतो. त्यामुळे



या प्रकल्पाचा प्राथमिक प्रकल्प अहवाल तयार करण्याची सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली.

मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली 'वर्षा' या शासकीय निवासस्थानी मुंबई आणि पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण क्षेत्रांतील पाणी नियोजन व व्यवस्थापनाचा आढावा घेण्यात आला. जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, मुंबई शहरचे सहपालकमंत्री मंगलप्रभात लोढा, नगरविकास विभागाचे अपर मुख्य सचिव असीमकुमार गुप्ता, अपर मुख्य सचिव डॉ. के. एच. गोविंदराज, बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त अश्विनी भिडे, जलसंपदा विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे महानगर आयुक्त डॉ. संजय मुखर्जी, पुणे महानगरपालिका आयुक्त नवलकिशोर राम, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे महानगर आयुक्त अभिजित चौधरी, पुणे विभागीय आयुक्त शीतल तेली उगले, पुणे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, मुख्यमंत्र्यांचे जलविषयक सल्लागार श्रीराम वेदिरे आदी उपस्थित होते.

पाण्याच्या पर्यायावर सूचना

'मुळशी धरणातून सुमारे आठ टीएमसी पाणी उपलब्ध करून ते जलवाहिनीद्वारे खडकवासला परिसरात आणण्याच्या पर्यायाची तांत्रिक आणि आर्थिक व्यवहार्यता तपासावी. यासह नदीखोरे जोडणी, अतिरिक्त जलस्रोत आणि भूजल पुनर्भरणाच्या उपायांचा दीर्घकालीन आराखड्यात समावेश करावा. पुणे महानगर प्रदेशातील पाणी मागणी पूर्ण करण्यासाठी मध्य कोकणातील सावित्री नदी परिसरातील पाणी कुकडी, भीमा, इंद्रायणी, मुळा-मुठा आणि नीरा खोऱ्यांकडे वळविण्याच्या नदीजोड पर्यायावरही विचार करावा. त्यासाठी कोकण खोरे ते भीमा खोरे नदी जोड योजना हा चांगला पर्याय होऊ शकतो. त्यामुळे या प्रकल्पाचा प्राथमिक प्रकल्प अहवाल तयार करावा,' अशी सूचनाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली.

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे महानगरआयुक्त डॉ.अभिजित चौधरी यांनी 'पीएमआरडीए'ने केलेल्या नियोजनाचे सादरीकरण केले. त्यानुसार, पुणे महानगर प्रदेशाची सध्याची लोकसंख्या सुमारे १.८० कोटी असून, सन २०४७ पर्यंत ती ४.१२ कोटींपर्यंत जाण्याचा अंदाज आहे. सध्या ३६.९० टीएमसी पाण्याचे आरक्षण उपलब्ध असून मागणी ४१.६५ टीएमसी आहे. सन २०४७ पर्यंत एकूण मागणी सुमारे १०० टीएमसी म्हणजेच ७ हजार ८१६ दशलक्ष लिटर प्रतिदिन होण्याचा अंदाज आहे, असे चौधरी यांनी सांगितले.

उंबरमाळी रेल्वे स्थानकावर अडकलेल्या प्रवाशांच्या मदतीला धावली 'लालपरी'

■ मुंबई (दै. संध्या)

काल रात्री मध्य रेल्वेच्या कसारा मार्गावरील वाहतूक रात्री नऊ वाजल्यापासून विस्कळीत झाल्याने उंबरमाळी रेल्वे स्थानकावर अनेक प्रवासी अडकून पडले होते. रात्रीची वेळ आणि प्रवासासाठी अन्य पर्याय उपलब्ध नसल्याने विशेषतः महिला व महाविद्यालयीन तरुणी चिंतेत होत्या. अशा परिस्थितीत कसारा येथे थांबलेली एसटी बस प्रवाशांच्या मदतीसाठी तातडीने उंबरमाळी येथे पोहोचली. एसटी चालक आणि वाहकाने दाखविलेल्या या समयसूचकतेमुळे अनेक प्रवाशांना सुरक्षित प्रवासाचा आधार मिळाला. या कर्तव्यदक्षतेचे परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी विशेष कौतुक केले.

रेल्वे वाहतूक ठप्प झाल्याने उंबरमाळी स्थानकावर चाकरमानी, विद्यार्थी, महिला आणि अन्य प्रवासी अडकले होते. ही बाब लक्षात येताच कसारा येथे थांबलेल्या एसटी बसचे चालक किरण खांडवी आणि वाहक राकेश पत्की यांनी परिस्थितीचे गांभीर्य ओळखून आगारात बसस्थानक प्रमुख यांना माहिती दिली. तसेच अडकलेल्या प्रवाशांच्या मदतीसाठी बस पाठविण्याची विनंती केली. बसस्थानक प्रमुख श्रीमती पूनम देशमुख यांनीही यास दुजोरा दिल्यानंतर लालपरी तातडीने उंबरमाळी स्थानकाकडे रवाना करण्यात आली.

रात्रीच्या वेळी एसटी बस उपलब्ध झाल्याने प्रवाशांनी सुटकेचा निश्वास सोडला. बसमध्ये महाविद्यालयीन तरुणी आणि नोकरदार महिलांची संख्या लक्षणीय होती. सुरक्षित प्रवासाची सोय झाल्याचे समजताच त्यांनी आपल्या पालकांना दूरध्वनी करून एसटी बस मदतीला आल्याची माहिती दिली. त्यामुळे कुटुंबीयांचीही चिंता दूर झाली. प्रवाशांनी चालक आणि वाहकाचे आभार मानले. त्यानंतर ही बस सर्व प्रवाशांना घेऊन नाशिकच्या दिशेने रवाना झाली.

या घटनेची दखल घेत परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी चालक किरण खांडवी, वाहक राकेश पत्की आणि संबंधित एसटी प्रशासनाचे अभिनंदन केले. 'एसटी महामंडळ ही केवळ प्रवासी वाहतुकीची सेवा नसून, अडचणीच्या प्रसंगी सामान्य माणसाच्या मदतीला धावून जाणारी विश्वासाची यंत्रणा आहे. प्रवाशांच्या अडचणीचे गांभीर्य ओळखून तत्परतेने मदतीचा हात देणाऱ्या कर्मचाऱ्यांमुळे महामंडळाची सेवाभावी परंपरा अधिक दृढ होत आहे,' असे त्यांनी नमूद केले.

प्रवाशांची सुरक्षितता आणि सुविधा यांना सर्वोच्च प्राधान्य देत संकटसमयी मदतीसाठी पुढाकार घेणे, हीच एसटीची खरी ओळख आहे. किरण खांडवी आणि राकेश पत्की यांनी आपल्या कृतीतून कर्तव्यनिष्ठेचा आदर्श घालून दिला आहे, अशा शब्दांत मंत्री सरनाईक यांनी संबंधित कर्मचाऱ्यांच्या कार्याचे कौतुक केले.

थोडक्यात...

जरांगेंच्या सांगण्यावरूनच भ्याड हल्ला: रेखा कोंडे

पुणे : दैनिक संध्या

पुण्यातील टिळक रस्त्यावरील महाराष्ट्र साहित्य परिषदेत शुक्रवारी (20 नोव्हेंबर) रात्री पुस्तक प्रकाशन सोहळ्यानंतर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे गट) महिला आघाडीच्या पुणे शहराध्यक्षा आणि अखिल भारतीय मराठा महासंघाच्या प्रदेशाध्यक्षा रेखा कोंडे यांना झालेल्या मारहाण प्रकरणाने आता अत्यंत गंभीर वळण घेतले आहे. या घटनेनंतर शनिवारी (21 नोव्हेंबर 2026) रेखा कोंडे यांनी पत्रकार परिषद घेत मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील आणि हल्लेखोर महिलांवर गंभीर आरोप केले आहेत. "मनोज जरांगे यांना 500 कोटींच्या क्लिपच्या एसआयटी चौकशीबाबत प्रश्न विचारल्याचा राग धरूनच त्यांच्या समर्थक महिलांनी माझ्यावर जीवघेणा हल्ला केला. विशेष म्हणजे, निमंत्रण नसताना कार्यक्रमात घुसून 'माझे मारणे गँगशी कनेक्शन आहे, मी शरद मोहोळची बहीण आहे, तुला संपवून टाकीन,' अशी धमकी देण्यात आली," असा खळबळजनक गौप्यस्फोट रेखा कोंडे यांनी केला आहे.

राज्यावर 1972 पेक्षाही भीषण दुष्काळाचे संकट

पुणे : दैनिक संध्या

राज्यातील रब्बी हंगामातील पेरण्यांच्या आकडेवारीचा अभ्यास केल्यास यंदाचा दुष्काळ 1972 पेक्षाही अधिक भयावह असल्याचे समोर आले आहे. 1972-73 च्या हंगामात 47.29 लाख हेक्टर क्षेत्रावर पेरण्या झाल्या होत्या, मात्र, यंदा आतापर्यंत केवळ 14 लाख 74 हजार 304 हेक्टरवरच पेरणी पूर्ण झाली आहे. डिसेंबरअखेरपर्यंत पेरण्या सुरू राहतात, तरीही यंदा हा आकडा जास्तीत जास्त 20 ते 25 लाख हेक्टरपर्यंतच पोहोचण्याचा अंदाज वर्तवण्यात येत आहे. राज्याच्या रब्बी हंगामाच्या आजवरच्या इतिहासातील ही सर्वांत नीचांकी पेरणी ठरण्याची भीती व्यक्त होत आहे. दुसरीकडे गेल्या नऊ महिन्यात 760 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्यात. प्रशांत महासागरात सध्या सक्रिय असलेला एल निनो हा शक्तीशाली म्हणजेच सुपर एल निनो असल्याचे हवामान विभागासह जागतिक हवामान संस्थांनी स्पष्ट केले आहे. याचा थेट फटका मोसमी पावसाला बसल्याने राज्यात सरासरीपेक्षा 19 टक्के कमी पावसाची नोंद झाली आहे. सोलापूर जिल्ह्यात सर्वाधिक म्हणजेच सरासरीच्या 59 टक्के कमी पाऊस बरसला असून, काही अपवाद वगळता संपूर्ण राज्यातच पावसाने ओढ दिली आहे. झालेला पाऊसही केवळ जुलै महिन्यातील 15 दिवसांतच पडल्याने खरीप हंगाम पूर्णपणे वाया गेला. आता ग्रामीण भागात पिण्याच्या पाण्याचीही शाश्वती उरली नसल्याने रब्बीच्या पेरण्या अत्यंत धिम्या गतीने सुरू आहेत. कृषी विभागाकडे 1960 पासूनची रब्बी पेरण्यांची अधिकृत नोंद उपलब्ध आहे. या आकडेवारीशी तुलना करता यंदाची दुष्काळी स्थिती आजवरची सर्वांत गंभीर ठरली आहे.

जनगणना 2027च्या कामास जिल्हा प्रशासनाने सर्वोच्च प्राधान्य द्यावे - राजेश अग्रवाल

■ मुंबई (दै. संध्या)

जनगणना 2027 च्या दुसऱ्या टप्प्यातील लोकसंख्या गणनेचे काम अचूक, पारदर्शक आणि निर्धारित वेळेत पूर्ण करण्यासाठी जिल्हा प्रशासनाने या कामास सर्वोच्च प्राधान्य द्यावे. जनगणनेच्या माध्यमातून संकलित होणारी माहिती पुढील नियोजन आणि विविध विकासकामांसाठी महत्त्वपूर्ण असल्याने सर्व संबंधित यंत्रणांनी समन्वयाने काम करावे, असे निर्देश मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांनी दिले. जनगणना 2027 च्या दुसऱ्या टप्प्याच्या तयारीचा आढावा घेण्यासाठी प्रधान जनगणना अधिकाऱ्यांची राज्यस्तरीय परिषद 21 नोव्हेंबर रोजी सह्याद्री अतिथीगृह, मलबार हिल, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. या परिषदेचे उद्घाटन मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्या आभासी उपस्थितीत झाले.

संयुक्त सचिव (भारत सरकार) व मुख्य प्रधान जनगणना अधिकारी, महाराष्ट्र डॉ. निरुपमा जे. डांगे यांनी जनगणनेतील माहिती अचूकपणे संकलित करण्याचे महत्त्व विशद केले. जनगणनेतील त्रुटींचा परिणाम मतदारसंघ पुनर्रचना, वैधानिक आरक्षण तसेच आगामी दशकातील लोकसंख्याविषयक मूलभूत आकडेवारीवर होऊ शकतो. त्यामुळे राज्यभरात तैनात करण्यात येणाऱ्या सुमारे २.८४ लाख प्रगणक व पर्यवेक्षकांनी प्रत्येक व्यक्तीची नोंद



होईल, याची दक्षता घ्यावी, असे त्यांनी सांगितले.

बेघर व्यक्ती, वसतिगृहे, कारागृहे, हॉटेल्स, पेइंग गेस्ट निवासस्थाने तसेच दुर्गम आणि वंचित भागांतील लोकसंख्येची नोंद घेण्यावर विशेष भर देण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. यासाठी ४० प्रश्नांची डिजिटल प्रश्नावली, प्रगणकांसाठी पीई मोबाइल ॲप, ऑनलाइन स्वयं-गणना आणि रिअल-टाइम देखरेख प्रणालीचा वापर करण्यात येणार आहे.


प्रधान सचिव व राज्य नोडल अधिकारी रणजित सिंग देओल यांनी जनगणना 2027 च्या दुसऱ्या टप्प्याच्या वेळापत्रकाची आणि राज्यातील तयारीची माहिती दिली. प्रगणक व पर्यवेक्षकांच्या नियुक्त्या, प्रशिक्षण आणि संबंधित प्रशासकीय प्रक्रिया निर्धारित वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

'नीट पेपरफुटी' प्रकरणात 14 आरोपींविरोधात आरोप निश्चित; 25 नोव्हेंबरपासून खटला सुरू होणार

■ नवी दिल्ली (दै. संध्या)

देशभरात गाजलेल्या नीट पेपरफुटीचं (NEET) केंद्रस्थान महाराष्ट्र निघाले होते. वैद्यकीय प्रवेश परीक्षेसाठी घेण्यात येणाऱ्या या नीट परीक्षेच्या पेपरफुटीचा तपास सीबीआयकडे देण्यात आला असून सीबीआयानेही धडाडीने कारवाई करत 14 आरोपींना अटक केली आहे. विशेष म्हणजे, नाशिक, पुणे आणि लातूरमधून सर्वांना अटक करण्यात आली होती. त्यामध्ये, लातूरमधील (latur) प्रसिद्ध मोटेगावकर क्लासेसच्या संचालकांनाही अटक करण्यात आली आहे. आता, याप्रकरणी न्यायालयात (Court) सर्वच 14 आरोपींवर आरोप निश्चित करण्यात आले असून 25 नोव्हेंबरपासून खटला सुरू होणार आहे.

नीट पेपरफुटी प्रकरणात अटकेत असलेल्या सर्वच 14 आरोपींविरोधात न्यायालयाने औपचारिक आरोप निश्चित केले आहेत. मात्र, सर्व आरोपींनी आरोप मान्य करण्यास नकार देत खटल्याला सामोरे जाण्याची भूमिका घेतली. त्यामुळे, याप्रकरणी 25 नोव्हेंबरपासून खटल्याला सुरुवात होणार आहे. आरोप निश्चित करण्यात आलेल्या कलमांमध्ये फसवणूक, विश्वासघात, भ्रष्टाचार आणि परीक्षेतील गैरप्रकारांशी संबंधित तरतुदींचा समावेश आहे. नॅशनल टेस्टींग एजन्सी म्हणजेच NTA शी तज्ज्ञ



म्हणून संबंधित असलेल्या मनीषा गुरुनाथ मांढरे, पी. व्ही. कुलकर्णी आणि मनीषा संजय हवालदार यांच्याविरोधात सार्वजनिक सेवक या नात्याने भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यांतर्गतही आरोप निश्चित करण्यात आले आहेत. त्यामुळे, देशभरात खळबळ उडवून देणाऱ्या या नीट पेपरफुटी घोटाळ्याच्या खटल्यात न्यायालयात काय काय युक्तिवाद केले जातात हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

दरम्यान, 3 मे रोजीच्या नीट परीक्षेचा पेपर फुटल्यानंतर ही परीक्षा एनटीएकडून रद्द करण्यात आली होती. त्यानंतर, 20 जून रोजी पुन्हा परीक्षा घेण्यात आली होती. या परीक्षेचा निकालही जाहीर करण्यात आला आहे. मात्र, 3 मे रोजीच्या पेपरफुटीप्रकरणातील आरोपींवर आणि संबंधित परीक्षेचा पेपर घेणाऱ्या लाभार्थ्यांवरही कारवाई केली जात आहे. तर, नीट पेपरफुटीप्रकरणानंतर दिल्लीतील जंतरमंतरवर मोठं आंदोलन उभारलं होतं. या आंदोलनाची धग देशभर पसरली, त्या पार्श्वभूमीवर केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांना राजीनामा द्यावा लागला होता.

लातूरच्या मोटेगावकर कुटुंबाला धक्का

नीट पेपरफुटी प्रकरणात लातूरमधील प्रसिद्ध मोटेगावकर कुटुंबाला मोठा धक्का बसलाय. आरसीसी कोचिंग क्लासेसचे संचालक आणि रसायनशास्त्राचे शिक्षक शिवराज मोटेगावकर यांचा मुलगा आदित्य मोटेगावकर याच्यावर आता दोन वर्षांसाठी नीट परीक्षेत बंदी घालण्यात आली आहे. आदित्यने यंदाची नीट-यूजी 2026 परीक्षा दिली होती. मात्र, परीक्षेतील कथित गैरप्रकाराच्या आरोपांनंतर त्याची उमेदवारी रद्द करण्यात आली. त्यानंतर 20 जून रोजी त्याची पुनर्परीक्षा घेण्यात आली. या निर्णयाविरोधात आदित्यने हायकोर्टात धाव घेतली होती. त्यावर हायकोर्टाने एनटीएला अंतिम निर्णय घेण्याचे निर्देश दिले होते.

परवान्याशिवाय प्रोटीन पावडर-सप्लिमेंट्स विकणाऱ्या जिम्सना टाळे ठोकणार

दिशाभूल करणाऱ्या इन्फ्लुएन्सर्सना 10 लाखांचा दंड; FDA आयुक्त तुकाराम मुंढे यांचा इशारा

■ मुंबई (दै. संध्या)

तरुणाई आणि नागरिकांच्या आरोग्याशी खेळ करणाऱ्या बोगस हेल्थ सप्लिमेंट्स, न्यूट्रास्युटिकल्स, प्रोटीन पावडर आणि वजन घटवणाऱ्या उत्पादनांविरोधात अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) आता कंबर कसली आहे. "यापुढे कोणतीही जिम, फिटनेस सेंटर, हेल्थ क्लब किंवा औषधालय अन्न सुरक्षा परवान्याशिवाय (FSSAI) हेल्थ सप्लिमेंट्सची विक्री किंवा शिफारस करू शकणार नाही. तसेच, 'मधुमेह, कॅन्सर बरा होतो किंवा झटपट वजन कमी होते' असे खोटे दावे करणाऱ्या कंपन्या आणि सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर्सवर थेट कायदेशीर कारवाई करून 10 लाख रुपयांपर्यंत दंड ठोठावला जाईल," असा सणसणीत इशारा एफडीए आयुक्त तुकाराम मुंढे यांनी दिला आहे. पत्रकार परिषदेत बोलताना त्यांनी यासंदर्भातील सर्वसमावेशक अनुपालन आदेश (कम्प्लायन्स ऑर्डर) जारी केल्याची माहिती देत, गेल्या 7 महिन्यांत राज्यात तब्बल 170.38 कोटी रुपयांचा भेसळयुक्त व अवैध साठा जप्त केल्याचा धक्कादायक लेखाजोखाच मांडला.

बाजारपेठेत गेल्या काही वर्षांत प्रोटीन पावडर, मल्टीव्हिटॅमिन गोळ्या, हर्बल कॅप्सूल आणि क्रीडापूरक आहाराची मागणी झपाट्याने वाढली असून, त्याचा तरुण पिढीच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत असल्याचे मुंढे यांनी नमूद केले.



प्रमुख खाद्यपदार्थांवरील कारवाई:

- **दूध:** 1504 तपासण्यांत 2.04 लाख लिटरपेक्षा अधिक (94 लाख रुपये किमतीचे) दूध जप्त; 12 गुन्हे व 56 अटक.
- **दुग्धजन्य पदार्थ (खवा, पनीर, मिठाई):** 2014 तपासण्यांत 3090 क्विंटल (12.43 कोटी रुपये किमतीचा) साठा जप्त; 6 गुन्हे व 3 अटक.
- **खाद्यतेल:** 1268 तपासण्यांत 78675 क्विंटल (27.60 कोटी रुपये किमतीचे) तेल जप्त.
- **मसाले:** 958 तपासण्यांत 2065 क्विंटल (22 कोटी रुपये किमतीचे) मसाले जप्त.
- **हॉटेल्स व रेस्टॉरंट्स:** 6988 तपासण्यांत 4442 नोटिसा, 937 परवाने निलंबित (754 जागेवरच निलंबन) आणि 23 परवाने रद्द.

उत्पादक, ब्रँड मालक, आयातदार, वितरक, गोदामे, फार्मसी, रुग्णालये, ई-कॉमर्स प्लॅटफॉर्म आणि जिम्स यांना हे नवे आदेश लागू आहेत. जिम ट्रेनर किंवा फिटनेस सेंटरकडून परवान्याशिवाय सप्लिमेंट्स विकणे किंवा सुचवणे हा गुन्हा ठरणार आहे.

हेल्थ सप्लिमेंट्स हे केवळ दैनंदिन आहाराला पूरक असतात, ते कोणताही आजार किंवा न्यूनता बरी करू शकत नाहीत. त्यामुळे प्रत्येक उत्पादनाच्या लेबलवर मोठ्या अक्षरात प्रवर्गाचे नाव, 'औषधी वापरासाठी नाही' (Not for medicinal use), शिफारस केलेल्या मात्रेपेक्षा जास्त सेवन करू नये आणि 'मुलांच्या आवाक्याबाहेर ठेवा' असे इशारे छापणे बंधनकारक आहे.

वनस्पतीजन्य घटकांमध्ये वनस्पतीचा नेमका कोणता भाग वापरला आहे हे नमूद करणे आवश्यक असून, अश्वगंधाच्या बाबतीत केवळ मुळांचाच वापर करण्यास परवानगी आहे. तसेच, उत्पादनाच्या नावात 'ओआरएस' (ORS) हा शब्द वापरण्यास सक्त मनाई करण्यात आली आहे. क्रीडा पोषण, वजन घटवणारी आणि लैंगिक स्वास्थ्य उत्पादनांमध्ये छुप्या पद्धतीने स्टेरॉइड्स व औषधी द्रव्ये मिसळली जातात का, याची विशेष तपासणी केली जाणार आहे.

राज्यात या क्षेत्रात 313 उत्पादक, 759 रिलेबलर आणि 28 रिपॅकर कार्यरत आहेत. एफडीएने 13 नोव्हेंबर रोजी राज्यातील 6 विभागांत (पुणे 5, नाशिक 5, कोकण 1, नागपूर 4, छत्रपती संभाजीनगर 1 आणि अमरावती 1) अशा एकूण 17 ठिकाणी एकाच वेळी छापे टाकून 1.38 कोटी रुपयांचा संशयित साठा जप्त केला आहे.

अन्न सुरक्षा व मानके कायदा आणि औषध व जादूटोणा प्रतिबंधक कायद्यांतर्गत (DMR Act) खालीलप्रमाणे कठोर शिक्षेची तरतूद असल्याचे मुंढे यांनी स्पष्ट केले. कृत्रिम दूध, बनावट पनीर (ॲनालॉग पनीर) आणि भेसळयुक्त खव्यावर एफडीएने कठोर कारवाई केल्यामुळे शुद्ध दुधाची मागणी मोठ्या प्रमाणात वाढल्याचे मुंढे यांनी सांगितले. याचा थेट फायदा ग्रामीण भागातील दूध उत्पादक शेतकऱ्यांना झाला असून, पूर्वी शेतकऱ्यांना दुधासाठी प्रतिलिटर 30 ते 33 रुपये दर मिळत होता, तो आता 45 ते 47 रुपयांवर (तर खुल्या बाजारात 60 रुपयांपर्यंत) पोहोचला आहे. त्यामुळे सुशिक्षित तरुणही आता दुग्धव्यवसायाकडे वळत आहेत.

दरम्यान, एफडीएच्या टोल-फ्री क्रमांकावर आणि 'complains.mahafda.in' या पोर्टलवर आतापर्यंत 19000 हून अधिक तक्रारी नागरिकांनी नोंदवल्या आहेत. "नागरिकांना माझे आवाहन आहे की, कोणत्याही दबावाला किंवा भुलथापांना बळी पडू नका. कोणतेही सप्लिमेंट घेण्यापूर्वी लेबल तपासा, डॉक्टरांचा सल्ला घ्या आणि कुठेही गैरप्रकार आढळल्यास थेट एफडीएकडे तक्रार करा, आम्ही तात्काळ कारवाई करू," असे आश्वासन तुकाराम मुंढे यांनी दिले.

संपादकीय

देवस्थान भक्ताच्या विश्वासाचे स्थान

अफाट उत्पन्न असलेल्या शिर्डी संस्थांनाने गॅस टंचाईचे कारण देत भक्तांना मिळणाऱ्या लाडू प्रसादात कपात केल्याची समजले. तर दुसरीकडे त्याच परिस्थितीत सौर ऊर्जेच्या सहाय्याने कोणतीही कपात न करता पूर्वी इतकाच महाप्रसाद देण्याचे शेगाव संस्थांनानी सांगितले. ही केवळ दोन देवस्थानाची तुलना नाही तर "नियत "आणि" नियोजन" यातील फरक अधोरेखित करणारे हे उदाहरण आहे. थोडे दोन्ही संस्थानाच्या उत्पन्नाचे आकडेवारी पाहिले तर विचार आणखी गंभीर होतो. शिर्डी संस्थांचे वार्षिक उत्पन्न ९०० कोटी रुपयांच्या आसपास आहे. तर शेगाव संस्थानचे उत्पन्न केवळ १५० कोटी रुपयांचे आसपास आहे. म्हणजे उत्पन्नाच्या बाबतीत शिर्डी शेगावपेक्षा अनेक पटीने मोठे आहे. तरी भक्तसेवा, सुविधा, पारदर्शकता, आणि व्यवस्थापनाच्या बाबतीत अनेक भाविकांना शेगावचा अनुभव अधिक समाधानकारक वाटतो. यावरून एक गोष्ट स्पष्ट होते की ती म्हणजे देवस्थानाचे उत्पन्न किती आहे, त्यापेक्षा ते चालवणारे संचालक मंडळ कसे आहे, त्यांची नियत काय आहे, आणि त्यांची नियोजन किती दूरदृष्टीचे आहे यावर सर्व काय अवलंबून आहे. व्यवस्थापनातील प्रत्यक्ष फरक पाहिला तर तो आणखी स्पष्ट दिसतो. शेगावचे अत्याधुनिक पार्किंग पाहिले की कोणीही आश्चर्यचकीत होईल,.. मुंबई दिल्ली सारख्या महानगरातही क्वचित दिसेल अशी व्यवस्था तिथे आहे. एकमेकांच्या विरुद्ध २५ पार्किंग लेन,कुठल्या लेनमध्ये जागा रिकामी आहे हे सांगणारे डिजिटल डिस्प्ले, आणि येण्या जाण्याचे स्वतंत्र मार्ग, ही संपूर्ण व्यवस्था अत्यंत शिस्तबध्द आणि पूर्णपणे विनामूल्य आहे. या उलट शिर्डीत अनेक ठिकाणी खाजगी पार्किंगसाठी एका तासाचे दोनशे रुपये किंवा त्याहून अधिक पैसे घेताना दिसतात. श्रद्धेने आलेल्या भाविकाकडून अशा प्रकारे पैसे उकळले जातात. हे खरोखर विचार करायला लावणारे आहे. मोफत सेवांचे मॉडेल हा शेवगाव संस्थांचा आणखी एक आदर्श आहे. रेल्वे स्टेशन, आणि बस स्थानकापासून मंदिरापर्यंत पूर्णपणे मोफत बस सेवा तिथे उपलब्ध आहे.त्यामुळे वृद्ध, महिला, आणि दूरवरून आलेले भाविक कोणत्याही त्रासाशिवाय मंदिरात पोहोचू शकतात. शिर्डी सारख्या अफाट उत्पन्न असलेल्या देवस्थानाने अशा सेवाभावी योजनाचा विचार करणे अपेक्षित आहे. भक्त निवास आणि स्वच्छता याबाबतीत शेगावचा अनुभव वेगळाच असतो. हे तिथे गेल्यावर जाणवते. शेगावला गेल्यावर तिथे जाणवणारी स्वच्छता अनेकांना युरोपियन दर्जाची वाटते. अत्यल्प दरात मिळणार स्वच्छ निवासस्थाने, आणि शिस्तबद्ध व्यवस्था, कर्मचाऱ्यांची नव्हे सेवाधा-याची विनम्रता, ही पंचतारांकित हॉटेलला ही लाजवेल अशी असते. याउलट शिर्डीत अनेक वेळा सामान्य भक्तांना निवास मिळवताना प्रचंड अडचणी येतात. तर कधी कधी राजकीय शिफारशी व ओळखी या गोष्टीमुळे भाविकांचा अनुभव कधी कधी नाही तर कायम कडू होतो.सामाजिक शिस्त ही शेगावची आणखी एक मोठी ताकद आहे. मंदिर परिसरात भिकाऱ्यांची गर्दी दिसत नाही. कोणीही भक्ताकडे हट्टाने दान मागत नाही. भाविकांनी दिलेला प्रत्येक पैसा अत्यंत पारदर्शक पद्धतीने समाजकार्यासाठी वापरला जातो. शेगाव संस्थांनानी मेडिकल कॉलेज, इंजिनिअरिंग कॉलेज सह अनेक शैक्षणिक संस्था आणि विविध लोकसेवा प्रकल्प उभे केले आहेत. म्हणजे भक्तांनी दिलेल्या पैशाचा उपयोग केवळ मंदिरापुरताच मर्यादित न राहता समाजाच्या उन्नतीसाठी होताना दिसत आहे.नक्कीच तो कौतुकास्पद आहे.देवस्थानाचे संचालन करणाऱ्या मंडळांनी हे लक्षात घ्यायला हवी की "भक्त सेवा हीच खरी ईश्वर सेवा आहे" जेव्हा संचालक मंडळ निस्वार्थी असते, दूरदृष्टीने काम करते, आणि त्याचे लक्ष केवळ भक्ताच्या सेवेवर व सोईवर असते, तेव्हा गॅस टंचाई सारखी अडचण प्रसादाला अडथळा ठरत नाही. त्यावर उपाय शोधले जातात. हे शेगावने सौर ऊर्जेचा वापर करून दाखवले आहे. म्हणून शेगाव संस्थानचे सर्व पूर्ण शिस्तबद्ध आणि पारदर्शक मॉडेल आज भारतातील प्रत्येक मोठ्या देवस्थानसाठी एक आदर्श आहे. देवस्थानाचे वैभव त्यांच्या सोन्या-चांदीत नसते तर भक्ताना दिलेल्या सन्मानात, सोयीमध्ये, आणि व्यवस्थेच्या प्रामाणिकपणात असते. भारताचे सर्व मंदिरातील व्यवस्थापन समिती यांनी शेगाव संस्थांचा आदर्श मनापासून स्वीकार करावा. कारण शेवटी मंदिर हे केवळ देवाचे घर नसते तर ते भक्ताच्या विश्वासाचे केंद्र असते

काळदरीतील विद्यार्थी व शिक्षकांच्या समयसुचकतेने वणवा आटोक्यात



■ काळदरी (दै. संध्या)

पुरंदर तालुक्यातील काळदरी येथील श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, सासवड संचलित श्री केदारेश्वर विद्यालय व ज्युनिअर कॉलेज, काळदरी या विद्यालयाच्या शेजारी वीजेच्या ट्रान्फार्मरची ठिणगी पडल्यामुळे तिथल्या गवताने पेट घेतला. बाजुला वाळलेले गवत असल्याने आग लवकरच भडकली. बघता बघता आग बाजुच्या भाताच्या पेंढ्यांना कवेत घेऊन गावातील घरांकडे येईल अशी परिस्थिती होती. शाळेतल्या विद्यार्थ्यांना धुर व आग दिसताच त्यांनी मुख्याध्यापक पांडुरंग दुर्गाडे यांना कळवित आग विझविण्याकरीता घटनास्थळी धाव घेतली व काही वेळातच आग आटोक्यात आणली.

दिपावली सुट्टीनंतर आजच विद्यालयाच्या द्वितीय सत्रास प्रारंभ झाला. विद्यालय नियमितपणे सुरु असताना दुपारी साडेबाराच्या दरम्यान ट्रान्फार्मरच्या ठिणगीमुळे अचानकपणे वणवा लागला.

दुपारच्या वेळी वाडीवरील मोठी माणसे बाहेर कामाला गेलेली होती. शाळेच्या जवळूनच विजेच्या खांबावरुन वीजवाहीन्यांच्या तारा गेलेल्या आहेत. त्याच खांबावर एका ठिकाणी वीजेचा ट्रान्सफॉर्मर आहे. या वीजेच्या ट्रान्फार्मरची ठिणगी वाळलेल्या गवतावर पडल्यामुळे तिथल्या गवताने पेट घेतला. दुपारचे उन्हामुळे थोड्याच वेळात आगीने रौद्ररूप धारण केले व परीसरातील जनावरांचा चारा आगीत भस्मसात होऊ लागला अशा परिस्थितीत समयसूचकता दाखवत विद्यालयातील शिक्षकांनी मोठ्या विद्यार्थ्यांची मदत घेत योग्य नियोजन करुन निलगिरी, करंज व हेळाच्या झाडांच्या झुबकेदार फांद्यांचा वापर करत आगीवर नियंत्रण मिळवले. तसेच भाताच्या पेंढ्यांचे उडवे व वाडीतील घरांना वाचवले व खऱ्या अर्थाने आपत्ती व्यवस्थापन कसे करायचे याचा वस्तुपाठच या निमित्ताने मुख्याध्यापक व शिक्षकांनी विद्यार्थ्यांना घालुन दिला. त्यामुळे मोठ्या प्रकारची हानी होण्यापासुन बचाव झाला. यामध्ये कोणतीही वित्त व जीवित हानी झाली नाही. परंतु विद्यार्थ्यांच्या समयसूचकतेमुळे परीसरातील जनावरांचा चारा वाचविण्यामध्ये विद्यार्थ्यांनी यश मिळवले.

विद्यार्थी व शिक्षकांचे सर्व ग्रामस्थांकडून कौतुक

"दुपारच्या वेळी गावातील मोठी मंडळी कामाला बाहेर गेलेले असताना, त्याचवेळी लागलेल्या या आगीच्या संकटातुन मार्ग काढणारे शाळेचे विद्यार्थी व शिक्षक यांचे कौतूक करावे तेवढे कमीच आहे." असे गौरवोद्गार उपस्थित ग्रामस्थ अमोल कारकर, तुकाराम राऊत यांनी काढले. आग विजवण्यासाठी इयत्ता दहावी व बारावीतील विद्यार्थ्यांनी तत्परता दाखवत साहिल ढगारे, अतिश कोंडके, संकेत भगत, हर्षद भोसले, गौरव सुर्वे, मयूर कारकर, पियूष पढेर, गुलाब मिरकुटे, नैतिक धिवार यांच्यासह विद्यालयातील शिक्षक शिवाजी गोडसे, पंडित चेंडके शिक्षकेतर कर्मचारी अशोक भगत व संतोष दोडके यांनी मोठे शर्थीचे प्रयत्न केले. *या साहसी कार्याबद्दल श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, सासवड या संस्थेच्या अध्यक्षा आनंदीकाकी जगताप, संस्थेचे सचिव तथा माजी आमदार संजयजी चंदूकाका जगताप, भारतीय प्रशासन सेवा अधिकारी व संस्थेचे विशेष सल्लागार डॉ. राजेंद्रबापू जगताप, संस्थेचे संस्थापक-सचिव - विश्वस्त- प्रा. सीए. डॉ. एम एस जाधव (सर), संस्थेच्या समन्वयिका सोनालीताई शिंदे, सहसचिव दत्तात्रय गवळी,व्यवस्थापक कानिफनाथ अमराळे यांनी सर्व विद्यार्थ्यांचे, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी या सर्वांचे कौतुक केले*

मुलांनी आईचे चारधाम यात्रेचे स्वप्न केले साकार!



■ शिरूर (दै. संध्या)

आईच्या मनातील इच्छा पूर्ण करण्यासाठी मुलांनी घेतलेला पुढाकार हा खऱ्या अर्थाने मातृप्रेमाचा सुंदर आदर्श ठरला आहे. कृषी उत्पन्न बाजार समिती, शिरूरचे माजी सहसचिव प्रभाकर राऊतमारे यांच्या पत्नी प्रतिभा प्रभाकर राऊतमारे यांची चारधाम यात्रा करण्याची अनेक वर्षांची इच्छा त्यांच्या मुलांनी पूर्ण केली. २०२२, २०२३ आणि २०२६ या तीन वर्षात टप्प्याटप्प्याने चारही धामांचे दर्शन घडवून आईचे स्वप्न साकार करण्यात आले.

या यात्रेत जगन्नाथपुरी, द्वारका, रामेश्वरम आणि बद्रीनाथ या चार प्रमुख तीर्थक्षेत्रांचे दर्शन घेण्यात आले. मोठे चिरंजीव . गणेश यांनी तीन धामांची, तर लहान चिरंजीव कपिल यांनी एका धामाची यात्रा घडवून आणली.मुले सुना आणि नातवंडे यांच्या सहवासात ही संपूर्ण यात्रा आनंदात पार पडली. प्रवासासाठी हवाई तसेच रेल्वे मार्गाचा वापर करण्यात आला. यात्रेतील अनुभव व्यक्त करताना प्रतिभा राऊतमारे म्हणाल्या, "चारही धामांच्या दर्शनाने मनाला अपार समाधान आणि आध्यात्मिक आनंद मिळाला. प्रत्येक तीर्थक्षेत्रातील अनुभव अविस्मरणीय होता. हिंदू धर्मात चारधाम यात्रेला विशेष महत्त्व आहे. प्रत्येकाने आपल्या आयुष्यात एकदा तरी चारधाम यात्रा करण्याचा प्रयत्न करावा. माझ्या मनातील ही इच्छा माझ्या मुलांनी पूर्ण केली, याचा मला मनस्वी आनंद आणि अभिमान वाटतो." आईच्या मनातील इच्छा ओळखून ती पूर्ण करण्यासाठी मुलांनी घेतलेला पुढाकार सर्वांसाठी प्रेरणादायी आहे. आईच्या स्वप्नाला मुलांच्या प्रेमाची जोड मिळाल्याने राऊतमारे कुटुंबीयांसाठी ही चारधाम यात्रा श्रद्धा, भक्ती, कौटुंबिक जिव्हाळा आणि आनंदाचा व समाधानाचा अविस्मरणीय अनुभव ठरली.

शाळेच्या स्टोअर रूमला आग



■ आळंदी (दै. संध्या)

केळगाव येथील श्री समर्थ प्री-प्रायमरी स्कूलच्या स्टोअर रूममध्ये गुरुवारी दुपारी २.२५ वाजण्याच्या सुमारास आग लागल्याची घटना घडली. इन्व्हर्टरमध्ये शॉर्टसर्किट होऊन वायरने पेट घेतल्याने आग पसरल्याचा प्राथमिक अंदाज आहे. घटनेची माहिती मिळताच आळंदी नगरपरिषदेच्या अग्निशमन दलाने तत्काळ घटनास्थळी धाव घेत आगीवर नियंत्रण मिळविले. शाळा सुटलेली असल्याने सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही.

नगरसेवक आदित्य घुंडरे, सुमित पवळे, केळगाव येथील नागरिक आणि आळंदी पोलीस स्टेशन यांच्यामार्फत आगीची माहिती मिळताच अग्निशमन वाहनासह कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. मुख्याधिकारी माधव खांडेकर आणि अग्निशमन विभागप्रमुख विष्णुकुमार शिवशरण यांच्या मार्गदर्शनाखाली आग विझविण्याची मोहीम हाती घेण्यात आली. प्राथमिक पाहणीत शाळेच्या स्टोअर रूममधील इन्व्हर्टरमध्ये शॉर्टसर्किट होऊन वायरने पेट घेतल्याचे निदर्शनास आले.

ओतूरमध्ये दोन दिवस सत्यशोधक अधिवेशन

■ नारायणगाव (दै. संध्या)

महात्मा जोतीराव फुले यांच्या जन्मद्विशताब्दी वर्षानिमित्त ओतूर येथे २१ व २२ नोव्हेंबर रोजी राज्यव्यापी विशेष सत्यशोधक अधिवेशनाचे आयोजन करण्यात आले आहे. ज्येष्ठ नेते शरदचंद्र पवार यांच्या हस्ते अधिवेशनाचे उद्घाटन होणार असून, खासदार शाहू महाराज अधिवेशनाच्या अध्यक्षस्थानी असणार आहेत. मार्केट यार्ड परिसरातील 'सत्यशोधक नगरी' येथे हा कार्यक्रम पार पडणार आहे.

सत्यशोधक भाऊ कोंडाजी डुंबरे पाटील प्रतिष्ठान, सारथ्य फाउंडेशन आणि ओतूर ग्रामस्थांच्या संयुक्त विद्यमाने या अधिवेशनाचे आयोजन करण्यात आले आहे. अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा क्रमांक २ येथे महात्मा जोतीराव फुले, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले आणि सत्यशोधक भाऊ कोंडाजी डुंबरे पाटील यांच्या अर्धपुतळ्यांचे अनावरण करण्यात येणार आहे. त्यानंतर लेझीम पथक, पथनाट्य आणि मान्यवरांच्या प्रतिमांची मिरवणूक काढण्यात येईल. उद्घाटनप्रसंगी कष्टकरी महिला व पुरुष श्रमिकांचा सन्मान केला जाणार आहे. यावेळी मंत्री छगन भुजबळ, बाळासाहेब थोरात, दिलीप वळसे-पाटील आणि खासदार डॉ. अमोल कोल्हे उपस्थित राहणार आहेत.

अधिवेशनात शिक्षण, महिला सक्षमीकरण, सामाजिक समता आणि शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर विविध परिसंवाद आयोजित करण्यात आले आहेत. पहिल्या दिवशी 'फुले आणि आजच्या शिक्षणाची दशा व दिशा' तसेच 'फुले आणि महिला सक्षमीकरण, समानतेचा नवा संघर्ष' या विषयांवर चर्चा होईल. सायंकाळी 'ज्योतीबाची सावली, सावित्री माऊली' हे महानाट्य सादर केले जाणार आहे.

दुसऱ्या दिवशी लघुनाटिका, सत्यशोधकांच्या विद्यमान वंशजांचा सन्मान आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. ज्येष्ठ शेतकरी नेते राजू शेट्टी यांच्या अध्यक्षतेखाली 'फुले आणि वर्तमानातील शेतकऱ्यांसमोरील आव्हाने' या विषयावर परिसंवाद होणार आहे. तसेच 'महाराष्ट्रधर्म : मुक्तचिंतन' या विषयावर विशेष सत्र आयोजित करण्यात आले असून, संजय आवटे अध्यक्षस्थानी असतील. माजी न्यायमूर्ती बी. जी. कोळसे-पाटील यांच्या उपस्थितीत अधिवेशनाचा समारोप होईल.

समस्यांवर व्यापक विचारमंथन

या अधिवेशनासाठी विदर्भ, मराठवाडा आणि खानदेशातून सुमारे दीड ते दोन हजार सत्यशोधक सहभागी होणार आहे. बाहेरगावाहून येणाऱ्या सहभागींच्या निवासाची व्यवस्था ओझर येथील विघ्नहर देवस्थान आणि लेण्याद्री देवस्थान येथे करण्यात आली आहे. महात्मा फुले यांच्या विचारांचा प्रसार करण्यासह सामाजिक समता, शिक्षण, महिला सक्षमीकरण आणि शेतकऱ्यांच्या समस्यांवर व्यापक विचारमंथन घडवून आणण्याच्या दृष्टीने हे अधिवेशन महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

शिरूरच्या लोकशाही लढ्याला कायदेतज्ज्ञांची निःस्वार्थ साथ

■ कवठे येमाई (दै. संध्या)

पुणे-अहिल्यानगर राष्ट्रीय महामार्ग क्र. ७५३-F वरील अपघातांचा धोका कमी करून रस्ता सुरक्षा उपाययोजना करण्याच्या मागणीसाठी सामाजिक कार्यकर्ते निलेश वाळुंज यांनी १८ ऑगस्ट २०२६ पासून शिरूर येथे सलग १३ दिवस लोकशाही मार्गाने आंदोलन केले होते. या आंदोलनादरम्यान वाळुंज यांच्यासह इतर आंदोलकांवर गुन्हे दाखल करण्यात आले होते.

या प्रकरणात घोडनदी (शिरूर) अतिरिक्त सत्र न्यायालयाने आंदोलकांचा अंतरिम जामीन कायम ठेवला आहे. या न्यायालयीन लढ्यात घोडनदी बार असोसिएशनचे माजी अध्यक्ष ॲड. उदय सरोदे, ॲड. अभिषेक बाफना, ॲड. सौरव साठे, ॲड. स्वप्नील कापरे, ॲड. ऋषिकेश भागवत, ॲड. निखिल मांजरे, ॲड. अतुल खेडकर व त्यांच्या सहकाऱ्यांनी कोणताही मोबदला न घेता कायदेशीर सहकार्य केले. या वकिलांच्या सामाजिक योगदानाचे ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनीही कौतुक केल्याचे निलेश वाळुंज यांनी सांगितले.लोकशाहीत शांततामय आंदोलनाचा अधिकार असून सामाजिक उत्तरदायित्व जपणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे, अशी भूमिका ॲड. उदय सरोदे यांनी मांडली. तर नागरिकांच्या जीवितसुरक्षेपेक्षा कोणतेही पद मोठे नसून जनहिताचा लढा सुरूच राहील, असा निर्धार निलेश वाळुंज यांनी व्यक्त केला.

नागेश्वर यात्रेत गैरवर्तन करणाऱ्यांवर बडगा

■ दौंड (दै. संध्या)

दौंड तालुक्यातील पाटस येथे ग्रामदैवत श्री नागेश्वर देवाची यात्रा मंगळवार व बुधवार, दि. २४ व २५ रोजी मोठ्या उत्साहात संपन्न होणार आहे. या यात्रेच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी यवत पोलीस प्रशासन सज्ज झाले असून, यात्रेत गैरवर्तन करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन कदम यांनी दिला आहे.

यात्रेच्या पहिल्या दिवशी रात्री नऊ वाजता नागेश्वर देवाची पालखी व छबिना सोहळ्याला सुरुवात होणार असून, पहाटे चार वाजेपर्यंत पालखी मिरवणूक पारंपरिक पद्धतीने पार पडणार आहे. दुसऱ्या दिवशी नागरिकांच्या मनोरंजनासाठी महाराष्ट्रातील प्रसिद्ध लोकनाट्य कलाकार रघुवीर खेडकर यांचा लोकनाट्य तमाशा



आयोजित करण्यात आला आहे. सकाळी नऊ वाजता हजेरीचा कार्यक्रम, तर रात्री नऊ वाजता पुन्हा लोकनाट्याचा कार्यक्रम होणार आहे. तसेच दुपारी तीन वाजता महाराष्ट्रातील नामांकित हिंदकेसरी पैलवानांच्या जंगी कुस्ती आखाड्याचे आयोजन करण्यात आले आहे. यात्रा शांततेत व सुरक्षित वातावरणात पार पडावी, यासाठी यवत पोलीस प्रशासनाच्या वतीने दोन दिवस चोख पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात येणार आहे. विशेष म्हणजे यात्रेच्या परिसरात तब्बल २५ सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत. या कॅमेऱ्यांच्या माध्यमातून सराईत गुन्हेगार, महिलांच्या दागिन्यांची चोरी करणारे चोरटे, रोडरोमिओ तसेच गर्दीच्या ठिकाणी गैरवर्तन करणाऱ्या व्यक्तींवर पोलिसांची करडी नजर राहणार आहे. यात्रा कमिटी व पाटस ग्रामस्थांसोबत झालेल्या बैठकीत सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन कदम यांनी स्पष्ट भूमिका मांडली. यात्रेदरम्यान कोणीही दारू पिऊन गोंधळ घालणे, महिलांची छेडछाड करणे, हुल्लडबाजी करणे किंवा कायदा व सुव्यवस्थेला बाधा निर्माण करण्याचा प्रयत्न केल्यास संबंधितांवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला. नागेश्वर यात्रेला मोठ्या संख्येने भाविक, कुस्तीप्रेमी व नागरिक उपस्थित राहणार असल्याने प्रत्येकाने पोलिसांना सहकार्य करावे आणि यात्रा शांततेत पार पाडावी, असे आवाहन पोलीस प्रशासन व यात्रा कमिटीच्या वतीने करण्यात आले आहे

सह्याद्री प्रतिष्ठानच्या पुढाकारातून शालेय विद्यार्थ्यांना MoM मोफत परीक्षेची संधी

■ जेजुरी (दै. संध्या)

.१९ विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धा परीक्षांविषयी जागरूकता निर्माण व्हावी, त्यांच्यातील कल्पनाशक्ती व वैचारिक क्षमता विकसित व्हावी तसेच विविध स्पर्धात्मक परीक्षांची प्राथमिक ओळख व्हावी, या उद्देशाने महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादित (MKCL) व सह्याद्री प्रतिष्ठान यांच्या वतीने आयोजित करण्यात येणारी 'मॉम' (MOM) परीक्षा जेजुरी येथील क्रिएटिव्ह कॉम्प्युटर येथे संपन्न झाली.

या उपक्रमांतर्गत सह्याद्री प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष सूरज शिवराज झगडे यांनी सामाजिक बांधिलकी जपत परिसरातील विद्यार्थ्यांना ही परीक्षा पूर्णपणे मोफत उपलब्ध करून दिली आहे त्यांच्या या पुढाकारामुळे विद्यार्थ्यांवर कोणताही आर्थिक भार न पडता परीक्षेत सहभागी होण्याची संधी मिळणार आहे. विद्यार्थ्यांना लहान वयातच स्पर्धा परीक्षांची ओळख व्हावी.

त्यांच्यामध्ये सामान्यज्ञान, तर्कशक्ती, विचारक्षमता आणि नवनवीन कल्पना आत्मसात करण्याची वृत्ती विकसित व्हावी, या व्यापक शैक्षणिक दृष्टिकोनातून MKCL मार्फत या परीक्षेचे आयोजन करण्यात आले होते. या परीक्षेच्या आयोजनासाठी क्रिएटिव्ह कॉम्प्युटरचे संचालक भानुदास कोलते , रोहित कळमकर प्रशिक्षक सौ. अनिता भोईटे यांनी विशेष पुढाकार घेतला.



RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे-४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले. संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०-२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

थोडक्यात पण महत्वाचे



वैकुंठ चतुर्दशीला तुळशीबाग राममंदिरात गाभाऱ्यात जाऊन घेता येणार दर्शन

पुणे : दैनिक संध्या

पेशवेकालीन तुळशीबाग श्रीराम मंदिरात वैकुंठ चतुर्दशी च्या दिवशी सोमवार, दि. २३ नोव्हेंबर २०२६ रोजी सकाळी ७ ते दुपारी १ यावेळेत थेट गाभाऱ्यात जाऊन प्रभू श्रीराम, माता सीता आणि लक्ष्मण यांच्या मूर्तीचे दर्शन घेता येणार आहे, अशी माहिती श्रीरामजी संस्थानचे कार्यकारी विश्वस्त मोरेश्वर तुळशीबागवाले यांनी दिली. पुणे प्रांताचे सरसुभेदार श्रीमंत नारो अप्पाजी तुळशीबागवाले यांनी सन १७६१ साली स्थापन केलेल्या देखण्या मंदिरामध्ये वर्षभर विविध धार्मिक कार्यक्रम होत असतात. श्री रामजी संस्थान तुळशीबागच्या वतीने श्रीराम मंदिरात दरवर्षी प्रमाणे वैकुंठ चतुर्दशीला आकर्षक मंदिर सजावट व विद्युतरोषणाई करण्यात येणार असून या सोहळ्यात भाविकानी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन संस्थानतर्फे करण्यात आले आहे.



मॉडेल स्कूल चांदे आणि ग्राम सचिवालयाचे मान्यवरांच्या हस्ते लोकार्पण !

पुणे : दैनिक संध्या

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण व आधुनिक शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देण्यासह गावपातळीवरील प्रशासकीय व्यवस्था अधिक सक्षम करण्याच्या दृष्टीने मुळशी तालुक्यातील चांदे येथे उभारण्यात आलेल्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मॉडेल स्कूल चांदे तसेच ग्राम सचिवालयाचे लोकार्पण मान्यवरांच्या हस्ते उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. या लोकार्पण सोहळ्यास भोर-राजगड-मुळशीचे आमदार श्री. शंकर मांडेकर, पुणे जिल्हा परिषदेचे अध्यक्ष श्री. वीरधवल जगदाळे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. गजानन पाटील, उपाध्यक्ष श्री. विवेक वळसे पाटील, ग्रामपंचायतीचे सरपंच, ग्रामसेवक, ग्रामस्थ तसेच विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शहरी भागातील शाळांच्या तोडीच्या शैक्षणिक सुविधा गावातच उपलब्ध व्हाव्यात, या उद्देशाने जिल्हा परिषदेमार्फत मॉडेल स्कूलची संकल्पना राबविण्यात येत आहे. आधुनिक शैक्षणिक वातावरण, गुणवत्तापूर्ण अध्यापन आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना देणाऱ्या सुविधांमुळे मॉडेल स्कूल चांदे ही परिसरातील विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक प्रगतीची नवी संधी ठरणार आहे. त्याचबरोबर ग्राम सचिवालयाच्या माध्यमातून गावातील विविध शासकीय सेवा व प्रशासकीय कामकाज एकाच छताखाली उपलब्ध होण्यास मदत होणार आहे. ग्रामस्थांना शासकीय योजनांची माहिती, विविध दाखले व प्रशासकीय कामांसाठी अधिक सुलभ आणि गतिमान सेवा मिळण्याच्या दृष्टीने ग्राम सचिवालय महत्त्वपूर्ण ठरणार आहे. यामुळे ग्रामपंचायतीच्या कामकाजात अधिक पारदर्शकता, सुसूत्रता आणि लोकाभिमुखता निर्माण होण्यास हातभार लागणार आहे. शिक्षण आणि ग्रामविकास या दोन्ही महत्त्वपूर्ण क्षेत्रांना बळकटी देणाऱ्या या उपक्रमांमुळे चांदे गावाच्या विकासाला नवी दिशा मिळणार असून, ग्रामीण भागातील पायाभूत सुविधा सक्षम करण्याच्या पुणे जिल्हा परिषदेच्या प्रयत्नांमध्ये आणखी एक महत्त्वपूर्ण टप्पा गाठला गेला आहे. जिल्हा परिषदेमार्फत ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना आधुनिक व गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी 303 मॉडेल स्कूल उभारण्याचा महत्त्वाकांक्षी उपक्रम हाती घेण्यात आला आहे. या उपक्रमांतर्गत बहुतांश शाळांची कामे पूर्ण झाली असून, उर्वरित शाळांची कामे डिसेंबर २०२६ अखेरपर्यंत पूर्ण करण्यात येणार आहे. या मॉडेल स्कूलच्या माध्यमातून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना आधुनिक शैक्षणिक सुविधा, अध्ययन-अध्यापनासाठी पूरक वातावरण आणि सर्वांगीण विकासाच्या संधी उपलब्ध करून देण्याचा जिल्हा परिषदेचा प्रयत्न आहे. कार्यक्रमास ग्रामपंचायत पदाधिकारी, अधिकारी, कर्मचारी, शिक्षक, ग्रामस्थ आणि परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

ज्वारी बियाणे तर ६ हजार एकर क्षेत्रासाठी मोफत हरभरा बियाण्याचा पुरवठा

पुणे : दैनिक संध्या

पुणे जिल्ह्यात कृषी विभागाकडून जिल्ह्यातील १३ तालुक्यातील शेतकऱ्यांना राष्ट्रीय अन्नसुरक्षा पोषण अभियान योजनेअंतर्गत ज्वारी पिकाच्या फुले यशोमती या वाणाचे १९ हजार ७७५ एकर क्षेत्रासाठी मोफत बियाणे पुरवठा करण्यात आला आहे. बियाणे वाटप करण्यात आलेल्या बहुतांश ठिकाणी पेरणी पूर्ण झाली आहे. चालू वर्षी दुष्काळी परिस्थिती असल्यामुळे जनावरांच्या चाऱ्याचा मोठा प्रश्न निर्माण होऊ शकतो या पार्श्वभूमीवर कृषी विभागाकडून मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांना मोफत बियाणे पुरवठा करण्यात आला आहे. यामुळे रब्बी हंगामात विहिरी, कॅनॉल, तलाव बोअरवेल या ठिकाणी पाणी उपलब्ध होऊ शकते अशा ठिकाणी ज्वारी पिकाची पेरणी केल्यानंतर त्यास २ ते ३ संरक्षित पाणी मिळाले तर ज्वारीचे धान्याचे उत्पादन होईल तसेच जनावरांसाठी मोठ्या प्रमाणात कडबा उपलब्ध होईल, यामुळे चारा टंचाईचा प्रश्न देखील निकाली निघू शकतो. शेतकऱ्यांना अजून १० हजार एकर क्षेत्रावर मोफत बियाणाचा पुरवठा करण्याचे नियोजन कृषी विभागाकडून सुरू असून, सदर बियाणे येत्या २ ते ३ दिवसात शेतकऱ्यांना वाटप करण्यात येणार आहे तरी ज्या शेतकऱ्यांना ज्वारी पिकाची पेरणी करायची आहे अशा शेतकऱ्यांनी महाडीबीटी पोर्टलवर मोठ्या प्रमाणात अर्ज करावेत असे आवाहन करण्यात आले आहे. रब्बी हंगामात पुणे जिल्ह्यात हरभरा हे प्रमुख पीक आहे. हरभरा पिकास कमी प्रमाणात पाणी लागते. २ ते ३ वेळेस पाणी दिल्यास हरभरा पीकाचे उत्पादन चांगले येते व जमिनीचा पोत देखील सुधारतो. हरभरा कमी पाण्यात येणारे पीक असल्यामुळे शेतकऱ्यांचा हरभरा पिकास चालू वर्षी मोठ्या प्रमाणात पसंती आहे . ज्या ठिकाणी ऊस तुटून जात आहे व उन्हाळ्यात पाण्याची कमतरता भासू शकते अशा ठिकाणी उसाचा खोडवा न राखता हरभरा पीक केल्यास, पीक फेरपालट होऊन बेवडदेखील होतो व जमिनीचा पोत सुधारण्यास मदत होते तसेच पुढील पीक चांगल्या प्रमाणात घेता येते.याकरिता चालू रब्बी हंगामात कृषी विभागाने जिल्ह्यात जवळपास ६ हजार ३२० एकर क्षेत्रासाठी हरभराचे मोफत बियाणे वाटप केले आहे. यापुढे शेतकऱ्यांच्या मागणीनुसार हरभरा बियाणाचे महाडीबीटी पोर्टलवर प्रमाणित बियाणे या घटकासाठी अर्ज न करता मिनीकिट या घटकासाठी अर्ज करावेत.

जबरी चोरी करणाऱ्या आरोपीला येरवडा पोलिसांकडून अटक

४० सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेज तपासून आरोपीचा शोध; २० हजारांचा मोबाईल हस्तगत

■ पुणे (दै. संध्या)



रात्रीच्या वेळी दुचाकीवरून येऊन नागरिकांना अडवून शिवीगाळ व मारहाण करत जबरी चोरी करणाऱ्या आरोपीला येरवडा पोलिसांनी अटक केली आहे. रेहान अश्रफ शेख (वय १९, रा. स. नं. २६, कलवड वस्ती, लोहगाव, पुणे) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. पोलिसांनी त्याच्याकडून चोरीस गेलेला सॅमसंग कंपनीचा २० हजार रुपये किमतीचा मोबाईल फोन हस्तगत केला आहे.

येरवडा पोलीस स्टेशनच्या हद्दीतील पुणे-नगर रोडवरून विमानतळाकडे जाणाऱ्या रस्त्यावर रात्रीच्या वेळी जबरी चोरीची घटना घडली होती. दुचाकीवरून आलेल्या तीन अनोळखी इसमांनी फिर्यादी यांना कोणतेही कारण नसताना शिवीगाळ करून मारहाण केली. त्यानंतर त्यांच्या ताब्यातील सॅमसंग कंपनीचा मोबाईल फोन, दोन ग्रॅम वजनाची सोन्याची अंगठी आणि रोख २९ हजार ६०० रुपये असा एकूण ५८ हजार ६०० रुपयांचा ऐवज जबरदस्तीने चोरून नेला होता. या प्रकरणी दि. ९ नोव्हेंबर २०२६ रोजी येरवडा पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा रजिस्टर क्रमांक ३९५/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता २०२३ मधील कलम ३०९ (६), ३०९ (४), १२६ (२), ३५२ आणि ३ (५) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर घटना गंभीर स्वरूपाची असल्याने आरोपींना तातडीने ताब्यात घेण्याच्या सूचना वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी तपास पथकाला दिल्या होत्या. पोलीस उपायुक्त परिमंडळ ४ श्री. चिलुमूला रजनिकांत आणि सहाय्यक पोलीस आयुक्त येरवडा विभाग श्री. सुनील जैतापूरकर यांनीही तपासाबाबत आवश्यक सूचना दिल्या होत्या. त्यानुसार वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. उमेश गित्ते यांच्या मार्गदर्शनाखाली येरवडा पोलीस स्टेशनच्या तपास पथकातील पोलीस अंमलदार गणेश पालवे, नटराज सुतार आणि संदिप जायभाये यांनी गुन्हा दाखल झाल्यानंतर घटनास्थळासह परिसरातील एकूण ४० सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेज तपासले.

सीसीटीव्ही फुटेजचे तांत्रिक विश्लेषण करून तसेच गुप्त बातमीदारांकडून मिळालेल्या माहितीची खात्री केल्यानंतर गुन्ह्यातील आरोपी कलवड वस्ती, लोहगाव परिसरात राहत असल्याचे पोलिसांना समजले. त्यानंतर तपास पथकाने तातडीने आरोपीच्या राहत्या घरी जाऊन त्याला ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान त्याने आपले नाव रेहान अश्रफ शेख (वय १९) असल्याचे सांगितले. दाखल गुन्ह्याबाबत विचारपूस केली असता त्याने गुन्हा केल्याची कबुली दिल्याचे पोलिसांनी सांगितले. त्यानंतर त्याला पुढील कारवाईसाठी येरवडा पोलीस स्टेशन येथे आणून दाखल गुन्ह्यात अटक करण्यात आली. आरोपीकडून फिर्यादी यांचा चोरीस गेलेला सॅमसंग कंपनीचा २० हजार रुपये किमतीचा मोबाईल फोन हस्तगत करण्यात आला आहे.

या गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक किशोर बेरड करीत आहेत. ही कामगिरी पुणे शहर पोलीस आयुक्त श्री. अमितेश कुमार, पोलीस सहआयुक्त श्री. संजय दराडे, अपर पोलीस आयुक्त (पूर्व प्रादेशिक विभाग) श्री. मनोज पाटील, पोलीस उपायुक्त परिमंडळ ४ श्री. चिलुमूला रजनिकांत आणि सहाय्यक पोलीस आयुक्त येरवडा विभाग श्री. सुनील जैतापूरकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

तसेच येरवडा पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. उमेश गित्ते, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री. केशव दिंडे आणि पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्रीमती शारदा कोकाटे यांच्या मार्गदर्शनाखाली तपास पथकाचे प्रभारी अधिकारी पोलीस उपनिरीक्षक किशोर बेरड, पोलीस हवालदार मुकुंद कोकणे, पोलीस अंमलदार गणेश पालवे, नटराज सुतार, शैलेश वाबळे, साईनाथ म्हस्के, अनिल मन्हाळकर, प्रशांत कांबळे, संदिप जायभाये, सोमनाथ गायकवाड आणि संदिप धादवड यांनी ही कामगिरी केली.

शेतकऱ्यांकरिता प्रधानमंत्री फसल विमा योजना केली सादर

■ पुणे (दै. संध्या)

एचडीएफसीएर्गो जनरल इन्शुरन्स कंपनी या भारतातीलखाजगी क्षेत्रामधील आघाडीच्याजनरल विमा कंपनीलामहाराष्ट्र शासनाने रब्बी हंगाम २०२६-२०२७ साठी जळगाव, हिंगोली, पुणे, सातारा, सोलापूर,अकोला आणि धुळे या जिल्ह्यांतील कर्जदार आणि बिगर-कर्जदार शेतकऱ्यांसाठी प्रधानमंत्रीफसल विमा योजना (पीएमएफबीवाय) राबवण्यासअधिकृत मान्यता दिली आहे.

महाराष्ट्र शासनाने या योजनेअंतर्गत अधिसूचित केलेल्याखालील पिकांसाठी संबंधित जिल्ह्यांमध्ये ही योजना राबवली जाईल, ज्यासाठी पीकनिहायअंतिम तारखा (कट-ऑफ डेट) देखील दिल्या आहेत.

उत्पादनातील घट निश्चित करण्याकरिता राज्य शासन या योजनेसाठीअधिसूचित केलेल्या क्षेत्रातील अधिसूचित पिकांवर पीक कापणी प्रयोगांचे (क्रॉप कटिंग एक्स्पेरिमेंट्स) (सीसीई) नियोजन आणि आयोजन करेल.

येस-टेक डेटा आणि आयोजित केलेल्या पीक कापणी प्रयोगांवर (सीसीई) आधारित उत्पादनाची आकडेवारी कमी असल्याचे निष्पन्नझाल्यास शेतकऱ्यांच्या उत्पादनात घट झाल्याचे मानले जाईल आणि त्यासाठी शेतकऱ्यांनाविमा दावा रक्कम देय असेल.ही योजनापेरणीपूर्व, काढणी आणि काढणीनंतर जोखमींसह पीक चक्राच्या सर्व टप्प्यांसाठी विमा संरक्षण देते.

मतदारांना मतदार यादीत नाव समाविष्ट करण्याची संधी

■ पुणे (दै. संध्या)

विशेष सखोल पुनरीक्षण (एसआयआर) प्रक्रियेदरम्यान काही कारणास्तव घरी अनुपस्थित असलेले किंवा कामानिमित्त परदेशात गेलेले मतदार तसेच पत्ता बदलल्यामुळे मसुदा मतदार यादीत नाव समाविष्ट न होऊ शकलेले मतदार यांना अंतिम मतदार यादीत नाव समाविष्ट करण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे. यासाठी संबंधित मतदारांनी आवश्यकतेनुसार परिशिष्ट-ब किंवा परिशिष्ट-क भरून द्यावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

एसआयआर प्रक्रियेदरम्यान प्रगणकांकडून गणना अर्जाचे (एन्युमरेशन फॉर्म) वाटप करण्यात येत असताना काही मतदार कामानिमित्त परदेशात गेले होते किंवा मतदार यादीत नमूद केलेल्या पत्त्यावर उपलब्ध नव्हते. अशा मतदारांना परिशिष्ट-ब भरून पुन्हा अंतिम मतदार यादीत नाव समाविष्ट करण्यासाठी अर्ज करता येणार आहे.

तसेच, ज्या मतदारांची नावे अनुपस्थित, स्थलांतरित, मृत अथवा दुबार (एएसडीडी) या वर्गवारीत समाविष्ट झाल्यामुळे मसुदा मतदार यादीत आलेली नाहीत आणि जे मतदार आता मतदार यादीतील जुन्या पत्त्यावर राहत नसून अन्य ठिकाणी स्थलांतरित झाले आहेत, त्यांनी परिशिष्ट-क भरावे. अशा मतदारांनी पुण्यातील जुन्या मतदार यादीत नमूद असलेल्या पत्त्याच्या भागातील मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) यांच्याकडून परिशिष्ट-क प्राप्त करून घ्यावे आणि स्थलांतरित झालेल्या नवीन ठिकाणी ते सादर करावे. यामुळे संबंधित मतदाराचे नाव नवीन ठिकाणच्या मतदार यादीत समाविष्ट होण्यास मदत होईल. यासाठी नमुना क्रमांक ८ भरू नये, असेही स्पष्ट करण्यात आले आहे. आपल्या भागातील बीएलओ कोण आहेत, हे जाणून घेण्यासाठी भारत निवडणूक आयोगाच्या संकेतस्थळावरील 'बुक अ कॉल विथ बीएलओ' या सुविधेचा वापर करता येईल. तसेच, एएसडीडी यादी पुणे जिल्हा प्रशासनाच्या *asddlist.pune.gov.in* या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. मतदारांनी आपल्या परिस्थितीनुसार योग्य ते परिशिष्ट भरून आवश्यक प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन जिल्हा निवडणूक यंत्रणेमार्फत करण्यात आले आहे.

राज्यस्तरीय शालेय स्क्वॅश क्रीडा स्पर्धेत पुणे विभागाला वैयक्तिक गटात प्रथम व तृतीय क्रमांक

आठ विभागांतील ३४ खेळाडूंचा सहभाग; विजेत्या खेळाडूंची राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड

■ पुणे(दै. संध्या)

शालेय खेळाडूंच्या क्रीडा कौशल्याला वाव मिळावा आणि भविष्यात राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील खेळाडू घडावेत, या उद्देशाने आयोजित सन २०२६-२७ मधील राज्यस्तरीय शालेय स्क्वॅश स्पर्धेत (१७ वर्षांखालील मुली) पुणे विभागाने वैयक्तिक गटात प्रथम व तृतीय क्रमांक मिळवत उल्लेखनीय कामगिरी केली.

क्रीडा व युवक सेवा संचालनालयांतर्गत जिल्हा क्रीडा परिषद, पुणे यांच्या वतीने ही स्पर्धा १९ नोव्हेंबर रोजी महाराष्ट्र रेसलिंग सेंटर असोसिएशन व रेसलिंग कोर्ट, एन.आय.बी.एम. रस्ता, उंड्री, पुणे येथे आयोजित करण्यात आली. या स्पर्धेत राज्यातील आठ विभागांतील ३४ खेळाडूंनी सहभाग घेतला.

स्पर्धेचे उद्घाटन खुले कारागृह, येरवडा, पुणे येथील अधीक्षक रामकांत शेजडे यांच्या हस्ते करण्यात आले. शेजडे हे स्वतः बॉक्सिंग या खेळाचे राष्ट्रीय स्तरावरील खेळाडू आहेत. यावेळी त्यांनी स्पर्धेच्या ठिकाणी आंतरराष्ट्रीय दर्जाचे अत्याधुनिक व चांगल्या दर्जाचे स्क्वॅश मैदान पाहून समाधान व्यक्त केले. महाराष्ट्रात अशा सुविधा विविध ठिकाणी निर्माण झाल्यास राज्यातील खेळाडूंना आंतरराष्ट्रीय स्तरावर आपली गुणवत्ता सिद्ध करण्याचा विश्वास व्यक्त करुन राष्ट्रीय पातळीवर प्राविण्य मिळविण्यासाठी खेळाडूंना अशा सुविधांचा निश्चितच लाभ होईल, असेही त्यांनी सांगितले.

यावेळी जिल्हा क्रीडा अधिकारी जगनाथ लकडे, उद्योजक नकल चव्हाण, महाराष्ट्र रेसलिंग फेडरेशनचे अध्यक्ष डॉ. प्रदीप खांदरे आदी मान्यवर उपस्थित होते. स्पर्धेचे सूत्रसंचालन राज्य क्रीडा मार्गदर्शक शिवाजी कोळी यांनी केले, तर आभार मनोज धिवार यांनी मानले. स्पर्धा पंच म्हणून सतीश पोतदार, आर्यन पोतदार, हिमतसिंग भाटी, खुमान सिंग भाटी, चेझहीन आणि निर्मलसिंग यांनी काम पाहिले.



स्पर्धेतील विजेते : वैयक्तिक गट - प्रथम – आरवी रैना, पुणे विभाग - द्वितीय – महिका सुब्रमण्यम, मुंबई विभाग - तृतीय – देवकी आनंद, पुणे विभाग - चतुर्थ – आराध्या वराडे, छत्रपती संभाजीनगर विभाग - पाचवा – निर्वी काबरा, पुणे विभाग सांघिक गट : प्रथम – पुणे विभाग, द्वितीय – नाशिक विभाग, तृतीय – लातूर व कोल्हापूर विभाग. या स्पर्धेत प्राविण्य मिळविणारे खेळाडू उदयपूर (राजस्थान) येथे १ ते ७ डिसेंबर २०२६ या कालावधीत होणाऱ्या ७० व्या राष्ट्रीय शालेय क्रीडा स्पर्धेत सहभागी होणार आहेत, असे जिल्हा क्रीडा अधिकारी जगन्नाथ लकडे यांनी कळविले आहे.

शिक्षण हे केवळ उद्योगांशीच नव्हे, तर समाजाच्या प्रश्नांशीही जोडले गेले पाहिजे : पाटील

एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठातर्फे आयोजित समस्या-आधारित शिक्षणावरील प्रादेशिक संशोधन परिषदेचे उद्घाटन

■ पुणे (दै. संध्या)



'राज्यात दुष्काळ आणि पाणीटंचाईची परिस्थिती अत्यंत गंभीर असून, त्यावर व्यावहारिक उपाय शोधण्यासाठी शिक्षण संस्था, स्थानिक प्रशासन आणि समाजाने एकत्रितपणे काम करण्याची गरज आहे. प्रकल्प-समस्या आधारित शिक्षण विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष समाजात जाऊन समस्या समजून घेत उपाय शोधण्यास प्रोत्साहित करते. आपले शिक्षण हे केवळ उद्योगांशीच नव्हे, तर समाजाच्या प्रत्यक्ष प्रश्नांशी जोडले गेले पाहिजे,' असे प्रतिपादन राज्याचे उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी केले.

एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठातर्फे आयसर पुणे येथे आयोजित 'उच्च शिक्षणातील समस्या-आधारित शिक्षण' या विषयावरील प्रादेशिक संशोधन परिसंवादाच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. शालेय शिक्षण, उच्च शिक्षण आणि उद्योग क्षेत्रातील समन्वय वाढविण्याच्या उद्देशाने सोलापूर येथील चौथ्या 'रिजनल रिसर्च सिम्पोजियम ऑन प्रोजेक्ट अँड प्रॉब्लेम-बेस्ड लर्निंग' या तीन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठाच्या वतीने करण्यात आले आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठाच्या कार्यकारी अध्यक्षा प्रा. स्वाती कराड चाटे होत्या. आयआयटी रोपरचे संचालक प्रा. राजीव आहुजा विशेष अतिथि म्हणून उपस्थित होते. डेन्मार्कमधील अलबोर्ग विद्यापीठाच्या युनेस्को पीबीएल सेंटरच्या संचालिका प्रा. क्झियानग्यून डू, विद्यापीठाचे संस्थापक-कुलगुरू डॉ. गोपाळकृष्ण जोशी आणि आयसरचे संचालक प्रा. सुनील भागवत याप्रसंगी उपस्थित होते. चंद्रकांत पाटील म्हणाले, 'राज्यात नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीच्या टप्प्यावर एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठाच्या पुढाकारातून ही महत्त्वाची परिषद होत आहे. "समस्या-आधारित शिक्षण विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष जीवनातील समस्यांचा शोध घेण्यास, एकत्र काम करण्यास आणि ज्ञानाचा व्यावहारिक वापर करण्यास प्रवृत्त करते. यातून रोजगार आणि सुजाण नागरिकत्वासाठी आवश्यक असलेले चिकित्सक विचार, सर्जनशीलता, संवादकौशल्य आणि सांघिक वृत्ती हे गुण विकसित होतात. ही कौशल्ये रोजगाराबरोबरच जबाबदार नागरिक घडविण्यासाठीही आवश्यक आहेत."

प्रा. स्वाती कराड चाटे यांनी समस्या-आधारित शिक्षणाचा शालेय स्तरावरही व्यापक अवलंब करण्याची गरज व्यक्त केली. 'उच्च शिक्षणात येणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये मूलभूत ज्ञानासोबतच संवादकौशल्यांची कमतरता जाणवते. विद्यार्थ्यांनी समाजातील समस्या ओळखून त्यावर चर्चा करावी आणि सामूहिकरीत्या उपाय शोधावेत. यातून त्यांचा आत्मविश्वास आणि संवादकौशल्य विकसित होण्यास मदत होईल,' असे त्या म्हणाल्या.

प्रा. राजीव आहुजा यांनी शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी शाळांमध्ये प्रशिक्षित आणि गुणवत्तापूर्ण शिक्षकांची गरज व्यक्त केली. 'कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगात शिक्षकांनी अध्यापनात नावीन्य आणून विद्यार्थ्यांना वर्गाकडे आकर्षित केले पाहिजे. इंटरनेटवर सहज उपलब्ध नसलेले ज्ञान, अनुभव आणि मार्गदर्शन शिक्षकांनी विद्यार्थ्यांना द्यावे,' असे आवाहन त्यांनी केले. प्रा. क्झियानग्यून डू यांनी समस्या-आधारित शिक्षण ही विविध ज्ञानशाखांना जोडणारी आणि समाजात अर्थपूर्ण बदल घडविणारी कार्यपद्धती असल्याचे सांगितले. डॉ. गोपाळकृष्ण जोशी यांनी परिषदेच्या आयोजनामागील भूमिका विशद केली. विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. कृष्णकेदार गुमास्ते यांनी उपस्थितांचे स्वागत केले, प्रा. रूपाली धामणे यांनी सूत्रसंचालन केले तर विद्यापीठाच्या परीक्षा नियंत्रक डॉ. प्रभा कासलीवाल यांनी आभार मानले.

"सत्तेच्या भुकेपोटी भारताची बदनामी करू नका!" राहुल गांधींच्या टीकेला रविंद्र चव्हाण यांचे सणसणीत प्रत्युत्तर

■ नवी दिल्ली (दै. संध्या)



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वावर आणि भारताच्या जागतिक स्थानावर प्रश्नचिन्ह उपस्थित करणाऱ्या काँग्रेस नेते राहुल गांधी यांना भाजपचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष आ. रविंद्र चव्हाण यांनी सडेतोड प्रत्युत्तर दिले आहे. '२०१४ पूर्वीचा भारत' आणि '२०१४ नंतरचा भारत' यातील फरक दोन आंतरराष्ट्रीय छायाचित्रांच्या माध्यमातून अधोरेखित करत त्यांनी राहुल गांधी यांच्या टीकेचा खरपूस समाचार घेतला आहे.

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प, रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन आणि चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांच्या एकत्रित छायाचित्राच्या आधारे राहुल गांधी यांनी भारताच्या जागतिक भूमिकेवर प्रश्न उपस्थित केले होते. त्याला प्रत्युत्तर म्हणून रविंद्र चव्हाण यांनी २०११ मध्ये फ्रान्स येथे झालेल्या G20 परिषदेत तत्कालीन पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग मागील रांगेत उभे असल्याचे, तर २०२४ मध्ये रिओ दि जानेरो येथे झालेल्या G20 परिषदेत पंतप्रधान नरेंद्र मोदी केंद्रस्थानी असल्याचे छायाचित्र शेअर केले. '२०१४ पूर्वीचा भारत' आणि '२०१४ नंतरचा भारत' अशी शीर्षके देत त्यांनी मोदीजींच्या नेतृत्वाखाली भारताच्या जागतिक प्रतिमेत झालेला बदल अधोरेखित केला आहे.

'दूध का दूध, पानी का पानी' असे म्हणत रविंद्र चव्हाण यांनी राहुल गांधी यांच्या टीकेतील आणि प्रत्यक्ष वस्तुस्थितीतील विसंगतीवर बोट ठेवले. "भूक सहन होईनाशी झाली की आपल्याला त्यापुढे काहीही दिसेनासं होतं. सत्तेच्या भुकेपुढे राहुलजींचीही हीच अवस्था झालीय," अशा शब्दांत त्यांनी राहुल गांधी यांच्यावर निशाणा साधला. तसेच, "या भुकेपोटी जर भारताची बदनामी करत सुटाल, तर याद राखा! कोणताही सच्चा भारतीय हे कधीही खपवून घेणार नाही!" असे ठणकावत त्यांनी राहुल गांधी यांना स्पष्ट इशाराही दिला. जागतिक व्यासपीठावरील भारताच्या स्थानावरून राहुल गांधी यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांना दोन कालखंडांतील छायाचित्रांची तुलना करत रविंद्र चव्हाण यांनी प्रत्युत्तर दिले आहे. राजकीय सत्तासंघर्षापलीकडे देशाची जागतिक प्रतिष्ठा महत्त्वाची असल्याचे अधोरेखित करत त्यांनी काँग्रेसच्या भूमिकेवर थेट प्रहार केला आहे.

रंगावलीतून उलगडला शिवचरित्रातील वैभवशाली इतिहास

'राजा शिव छत्रपती' प्रदर्शनात शौर्य, पराक्रम आणि स्वराज्यनिर्मितीच्या प्रसंग रंगावलीतून साकार

■ पुणे (दै. संध्या)




छत्रपती शिवाजी महाराजांचे जीवन म्हणजे स्वराज्यनिर्मितीचा ध्यास, शौर्याचा इतिहास आणि रयतेच्या कल्याणासाठी केलेल्या संघर्षाची प्रेरणागाथा. या प्रेरणागाथेतील ऐतिहासिक प्रसंगांना रंगावलीच्या माध्यमातून कलात्मक रूप देत 'राजा शिव छत्रपती' या प्रदर्शनातून शिवचरित्राचा वैभवशाली पट उलगडण्यात आला. अफजलखान वधापासून शिवराज्याभिषेकापर्यंतच्या महत्त्वपूर्ण घटनांचे प्रभावी चित्रण करणाऱ्या या रंगावल्यांनी इतिहास आणि कलेचा सुंदर संगम साधला. शारदा अवसरे आणि सहकलाकार यांच्या संकल्पनेतून कोथरूड मधील यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात भव्य रंगावली प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. या प्रदर्शनाच्या उद्घाटन प्रसंगी ज्येष्ठ इतिहास संशोधक आणि भारत इतिहास संशोधक मंडळाचे सचिव पांडुरंग बलकवडे, प्रसिद्ध रंगावलीकार अक्षय शहापूरकर आणि रंगावलीकार शारदा अवसरे उपस्थित होते. श्रीरंग कलादर्पण फाउंडेशन, पुणे आणि प्रा. अक्षय शहापूरकर यांचे या उपक्रमाला मार्गदर्शन लाभले.

अफजलखान वध, पावनखिंडीचा रणसंग्राम, स्वराज्याची शपथ, सोन्याचा नांगर, संत तुकाराम महाराज आणि छत्रपती शिवाजी महाराज यांची भेट, शाहिस्तेखानाची बोटे छाटण्याचा प्रसंग, बाल शिवबाला जिजाऊ मातांकडून मिळणारे संस्कार आणि शिवरायांचे आरमार अशा विविध ऐतिहासिक प्रसंगांचे चित्रण रंगावलीतून करण्यात आले. शिवराज्याभिषेकाची भव्य रंगावली प्रदर्शनाचे विशेष आकर्षण ठरली. या रांगोळीचा आकार २३ फूट बाय १२ फूट असून यासाठी १० किलो रांगोळी आणि रंग वापरण्यात आले आहेत. स्वतः शारदा अवसरे , प्रियांका सातव , ऋतुजा पोतदार या कलाकारांनी ही रांगोळी साकारली आहे. रंगावलीतील बारकावे, प्रसंगांची अचूक मांडणी आणि रंगांच्या माध्यमातून साकारलेले ऐतिहासिक क्षण यामुळे प्रेक्षकांना शिवरायांच्या जीवनातील महत्त्वपूर्ण घटनांचा कलात्मक अनुभव उपस्थितांनी घेतला. दिनांक २१ ते २४ नोव्हेंबरदरम्यान सकाळी दहा ते रात्री आठ या वेळेत हे प्रदर्शन आयोजित करण्यात आले.

शारदा अवसरे म्हणाल्या, या प्रदर्शनात एकूण २१ रंगावल्या साकारण्यात आल्या असून, ४० कलाकारांनी सहभाग घेतला. रंगावलीच्या माध्यमातून छत्रपती शिवाजी महाराजांचे जीवनकार्य, स्वराज्याचा इतिहास आणि त्यामागील प्रेरणादायी विचार नव्या पिढीपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न या प्रदर्शनातून करण्यात आला.

थोडक्यात पण महत्वाचे



दुष्काळग्रस्त बांधवांच्या मदतीसाठी रूपाली धाडवे यांच्याकडून एक लाखांची मदत

पुणे : दैनिक संध्या

केंद्रीय सहकार व नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री तथा पुण्याचे खासदार मुरलीधर मोहोळ यांच्या वाढदिवसानिमित्त दुष्काळग्रस्त बांधवांच्या मदतीसाठी करण्यात आलेल्या आवाहनाला प्रतिसाद देत पुणे महापालिकेच्या स्थायी समिती सदस्या व नगरसेविका रूपाली दिनेश धाडवे यांनी एक लाख रुपयांची आर्थिक मदत दिली. या मदतीचा धनादेश त्यांनी मुरलीधर मोहोळ यांच्याकडे सुपूर्द केला. वाढदिवस साजरा करताना सामाजिक बांधिलकी जपत गरजू आणि दुष्काळग्रस्त बांधवांना मदतीचा हात देण्याचा उपक्रम स्तुत्य असल्याचे यावेळी उपस्थितांनी नमूद केले. मदतीचा धनादेश सुपूर्द केल्यानंतर रूपाली धाडवे यांनी मोहोळ यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. तसेच त्यांना उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य आणि पुढील सामाजिक व राजकीय वाटचालीसाठी शुभेच्छा व्यक्त केल्या. यावेळी माजी नगरसेवक दिनेश ऊर्फ पिंटूभाऊ धाडवे, सहकारी नगरसेवक बाळाभाऊ ओसवाल, राजेंद्र आबा शिळीमकर, श्रीकांत भाई गायकवाड, बारामती जिल्हाध्यक्ष शेखर वडणे आणि विठ्ठल वरुडे पाटील उपस्थित होते.

केळीगावातील १५० कुटुंबांना जीवनावश्यक साहित्य, प्रविण भालेकरांचा पुढाकार!

पिंपरी-चिंचवड : दैनिक संध्या

केळीगावातील १५० गरजू आदिवासी कुटुंबांना नगरसेवक प्रविण भालेकर यांनी जीवनावश्यक वस्तूंच्या किटचे वाटप केले. भाजपा नेते तथा भोसरीचे आमदार महेश लांडगे यांच्या वाढदिवसानिमित्त राबविण्यात येत असलेल्या 'एक हात मदतीचा... माणुसकीच्या नात्याचा!' या सेवाभावी उपक्रमांतर्गत भालेकर यांनी गावात प्रत्यक्ष जाऊन कुटुंबांपर्यंत मदत पोहोचवली. राज्यातील दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानुसार हा उपक्रम हाती घेण्यात आल्याची माहिती आयोजकांनी दिली. खेड, जुन्नर आणि आंबेगाव तालुक्यांतील दुर्गम भागातील गरजू कुटुंबांना जीवनावश्यक साहित्य उपलब्ध करून देणे हा उपक्रमाचा उद्देश आहे. त्याअंतर्गत भालेकर यांनी केळीगावातील कुटुंबांसाठी या वाटपाचे आयोजन केले. आमदार लांडगे यांच्या सामाजिक कार्यातून प्रेरणा घेत त्यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने गरजू कुटुंबांच्या दैनंदिन गरजांना हातभार लावण्यावर या उपक्रमात भर देण्यात आला. पुणे जिल्ह्यातील ५१ आदिवासी व दुष्काळग्रस्त गावांमधील गरजू कुटुंबांपर्यंत मदत पोहोचविण्याच्या व्यापक मोहिमेचा केळीगावातील वाटप हा एक भाग आहे.

गुळूंचे येथील ज्योतिर्लिंग देवाची यात्रा उत्साहात संपन्न

■ नीरा (दै. संध्या)



पुरंदर तालुक्यातील काटेबारस यात्रेसाठी प्रसिद्ध असलेल्या गुळूंचे येथील ग्रामदैवत ज्योतिर्लिंग देवाची वार्षिक यात्रा आज मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात संपन्न झाली. यात्रेनिमित्त परिसरातील हजारो भाविकांनी ज्योतिर्लिंगाचे दर्शन घेण्यासाठी गर्दी केली होती. यंदा पावसाअभावी निर्माण झालेल्या दुष्काळी परिस्थितीतून लवकर मुक्तता व्हावी, तसेच बळीराजाला सुखाचे दिवस यावेत, असे साकडे भाविकांनी ज्योतिर्लिंगाच्या चरणी घातले.

दिवाळी पाडव्याच्या दुसऱ्या दिवशी घटस्थापना करून या यात्रोत्सवाला प्रारंभ झाला होता. त्यानंतर सलग अकरा दिवस मंदिरात विविध धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये कीर्तन, प्रवचन आदी धार्मिक कार्यक्रमांसह पारंपरिक छबिना मोठ्या उत्साहात पार पडला. नोकरी व व्यवसायानिमित्त गावाबाहेर राहणारे अनेक ग्रामस्थही या यात्रोत्सवानिमित्त गावी दाखल झाले होते. अकरा दिवस ज्योतिर्लिंगाची सेवा आणि भक्तिमय वातावरणात विविध धार्मिक कार्यक्रम पार पडल्यानंतर आज काटेबारस यात्रेने या उत्सवाची सांगता झाली.

यात्रेसाठी येणाऱ्या भाविकांच्या आरोग्याची काळजी घेत निरा येथील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वतीने आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यात आली होती. तसेच जेजुरी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक रवींद्र पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली यात्रास्थळी चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. यासाठी गुळूंचे गावचे पोलीस पाटील दीपक जाधव, सहाय्यक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर उदार, पोलीस उपनिरीक्षक श्रीराम पालवे, अमोल थोरात महिला पोलीस निरीक्षक राणे, पोलीस उपनिरीक्षक रविराज कोकरे सागर चौधरी, रुपेश नावडकर, सचिन निकम, प्रसाद कोळेकर, मुनीर मुजावर यांनी विशेष सहकार्य केले.

श्रद्धा, परंपरा आणि ग्रामएकतेचा संगम असलेल्या या यात्रोत्सवाची काटेबारस यात्रेने उत्साहात सांगता झाली.

ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या वंदना परदेशी यांचे निधन

■ नारायणगाव (दै. संध्या)



जुन्नर येथील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या वंदना शैलेंद्र सिंग परदेशी (वय ६५) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या निधनाने सामाजिक क्षेत्रात हळहळ व्यक्त केली जात आहे.

ज्येष्ठ नागरिक संघातील सदस्यांना आरोग्य सुविधा व भजनी मंडळामध्ये त्यांचा सक्रिय सहभाग होता.त्यांच्या पश्चात दोन मुलगे, सुना आणि नातवंडे असा परिवार आहे. जुन्नर नगर परिषदेचे माजी उपनगराध्यक्ष दीपेशसिंह परदेशी आणि पत्रकार अतुल परदेशी हे त्यांचे पुत्र होत.

हायवा ट्रकच्या चार आणि ट्रॅक्टरची एक अशा एकूण पाच बॅटऱ्या लंपास

■ नवी दिल्ली (दै. संध्या)



उरुळी कांचन प्रतिनिधी : हवेली तालुक्यातील उरुळी कांचन पोलीस ठाण्याच्या हद्दीत वाहनांच्या बॅटऱ्या चोरीच्या घटनांनी वाहनमालकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. शुक्रवारी (ता. २० नोव्हेंबर) रात्री चोरट्यांनी एकाच रात्री तीन वाहनांना लक्ष्य करत तब्बल पाच बॅटऱ्या चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. या चोरीमध्ये हायवा ट्रकच्या चार आणि एका ट्रॅक्टरच्या बॅटरीचा समावेश असून, अंदाजे सुमारे ५७ हजार ५०० रुपयांचे आर्थिक नुकसान झाले आहे.

पहिली घटना पुणे-सोलापूर महामार्गावरील इनामदार वस्ती येथील मानसरोवर सोसायटी परिसरात घडली. येथे पार्किंगमध्ये उभ्या असलेल्या दोन हायवा ट्रकच्या प्रत्येकी दोन अशा एकूण चार बॅटऱ्या चोरट्यांनी लंपास केल्या. ट्रक मालक अशोक मुरकुटे यांनी दिलेल्या माहितीनुसार, या दोन्ही हायवा ट्रकमध्ये नुकत्याच नवीन बॅटऱ्या बसविण्यात आल्या होत्या. एका बॅटरीची किंमत अंदाजे १२ हजार रुपये असून, चार बॅटऱ्यांची एकूण किंमत ४८ हजार रुपये इतकी आहे.

तर दुसरी घटना शिंदवणे ग्रामपंचायत हद्दीतील काळे शिवार येथे घडली. येथील विशाल महाडिक यांच्या ट्रॅक्टरची बॅटरीही त्याच रात्री चोरट्यांनी चोरून नेली. असल्याचे महाडिक यांनी सांगितले. या बॅटरीची किंमत अंदाजे ९ हजार ५०० रुपये असल्याचे समजते.

अशा प्रकारे एकाच रात्री तीन वाहनांमधील पाच बॅटऱ्या चोरीला गेल्याने परिसरातील वाहनमालकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. विशेष म्हणजे, महामार्गालगत तसेच गाव परिसरात पार्किंगमध्ये उभ्या असलेल्या वाहनांनाही चोरटे लक्ष्य करत असल्याने वाहनांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

गेले काही महिन्यापूर्वी उरुळी कांचन परिसरात पार्किंग असलेल्या वाहनांच्या बॅटरी चोरीला जात असल्याच्या अनेक घटना घडल्या होत्या त्यावेळी उरुळी कांचन पोलीस स्टेशनच्या हाकेच्या अंतरावरील इंडियन ऑइल पेट्रोल पंपपात पार्किंग असलेल्या हायवा ट्रकच्या बॅटऱ्या चोरी गेल्या होत्या.

उरुळी कांचन आणि परिसरातील गावांमध्ये वाहनांच्या बॅटऱ्या चोरीच्या घटनांना आळा घालण्यासाठी उरुळी कांचन पोलिसांनी रात्रीची गस्त अधिक प्रभावी करावी. संशयास्पद व्यक्ती व वाहनांवर लक्ष ठेवून बॅटरी चोरट्यांचा शोध घेऊन त्यांच्यावर कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिक व वाहनमालकांकडून केली जात आहे.

सनीभैय्या जाधव यांच्या वाढदिवसानिमित्त अनाथ मुलांना आनंदाची सहल

■ शिरूर (दै. संध्या)

शिरूर ग्रामीण ग्रामपंचायतीचे सदस्य तथा सामाजिक कार्यकर्ते सनीभैय्या जाधव यांच्या वाढदिवसानिमित्त अजय जाधव यांच्या संकल्पनेतून सामाजिक बांधिलकी जपत एक स्तुत्य उपक्रम राबविण्यात आला. शिरूर येथील द मदर ग्लोबल फाउंडेशन संचलित श्री मनःशांती छात्रालय, माईनगरी, शिरूर येथील अनाथ व गरजू विद्यार्थ्यांसाठी एका दिवसीय आनंददायी सहलीचे आयोजन करण्यात आले होते. या सहलीसाठी विद्यार्थ्यांना पारनेर तालुक्यातील अळकुटी येथील ऑर्सन रिसॉर्ट येथे नेण्यात आले.

या सहलीदरम्यान विद्यार्थ्यांसाठी विविध मनोरंजक खेळ, मनोरंजनात्मक कार्यक्रम आणि आनंददायी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. तसेच सर्व विद्यार्थ्यांसाठी अन्नदान करण्यात आले. दिवसभर विविध खेळ आणि मनोरंजनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी मनसोक्त आनंद लुटला. त्यांच्या चेहऱ्यावरील हास्य आणि उत्साहाने संपूर्ण परिसर आनंदमय झाला होता. वाढदिवसाच्या निमित्ताने केवळ शुभेच्छा आणि सत्कारापुरते मर्यादित न राहता अनाथ मुलांच्या चेहऱ्यावर आनंद फुलविण्याचा हा उपक्रम निश्चितच कौतुकास्पद ठरला. समाजातील वंचित आणि गरजू घटकांना आनंदाचे काही क्षण देणे, त्यांच्यासोबत वेळ घालवणे आणि त्यांना आपलेपणाची जाणीव करून देणे, हाच या उपक्रमामागील मुख्य उद्देश होता. अजय जाधव यांच्या कल्पनेतून साकारलेल्या या उपक्रमाचे उपस्थितांकडून विशेष कौतुक करण्यात आले.

यावेळी सर्व शिक्षकवृंद, अजय जाधव, सनीभैय्या जाधव, विनय सपकाळ, सीमाताई सपकाळ, सचिन ढोरमले, लौकिक शहा यश सुर्यवंशी यांच्यासह मित्रपरिवार उपस्थित होता.





पिंपरी-चिंचवड आणि परिसर
रविवार, दि. २२ नोव्हेंबर २०२६
दैनिक संध्या
निःपक्ष समीक्षणाय... निर्भीड दैनिक

थोडक्यात पण महत्वाचे



अनधिकृत बांधकामांवर महापालिकेचा हातोडा

पिंपरी : दैनिक संध्या

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या 'क' क्षेत्रीय कार्यालयाच्या वतीने प्रभाग क्रमांक ९ मधील अजमेरा कॉलनी रोड आणि नेहरुनगर परिसरात अनधिकृत पत्राशेड व बांधकामांविरोधात धडक कारवाई करण्यात आली. गुरुवारी (दि. २० नोव्हेंबर) करण्यात आलेल्या या कारवाईत दोन ठिकाणची सुमारे १ हजार ४५० चौरस फुटांची अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्यात आली. महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या आदेशानुसार, अतिरिक्त आयुक्त-२ तृप्ती सांडभोर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि 'क' क्षेत्रीय अधिकारी अजिंक्य येळे यांच्या अधिपत्याखाली ही कारवाई करण्यात आली. या मोहिमेत महापालिकेच्या धडक कारवाई पथकातील बीट निरीक्षक प्रतिका चौरंगे, सौरभ शिरसाठ, इम्रान पठाण आणि दत्तात्रय छडीदार यांनी सहभाग घेतला. तसेच कारवाईसाठी १९ एमएसएफ जवान, ६ मजूर, १ जेसीबी आणि १ क्रेनची मदत घेण्यात आली. महापालिकेच्या या कारवाईमुळे अजमेरा सोसायटी रोड आणि नेहरुनगर परिसरातील अनधिकृत बांधकामांना आळा घालण्याच्या दृष्टीने महत्त्वाचे पाऊल उचलण्यात आले आहे.

मटण दुकानांमध्ये मटणाचे प्रदर्शन न करताच विक्री व्हावी; यावर प्रशासनाने तातडीने कार्यवाही करावी

पिंपरी : दैनिक संध्या

शहरातील सर्व मटण दुकानांमध्ये मटणाचे उघड्यावर प्रदर्शन न करता, समोरून योग्य आच्छादन किंवा पडदे लावून आतल्या पद्धतीनेच मटणाची विक्री व्हावी, अशी स्पष्ट व ठाम भूमिका स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे यांनी महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत मांडली. या संदर्भातील सविस्तर अहवाल पुढील आठ दिवसांत सादर करून तो स्थायी समितीसमोर मान्यतेसाठी आणला जाईल, तसेच प्रशासनाने यावर तातडीने कारवाई करावी, असे निर्देशही त्यांनी दिले. महापालिका सर्वसाधारण सभेत शहरातील नागरी प्रश्न, स्वच्छता आणि प्रशासकीय कामकाजावर बोलताना बारणे यांनी विविध मुद्द्यांकडे सभागृहाचे आणि प्रशासनाचे लक्ष वेधले.



शहरातील मुख्य रस्ते आणि बाजारपेठांलगतच्या मटण दुकानांसमोर उघड्यावर होणाऱ्या प्रदर्शनामुळे नागरिकांना होणारा त्रास आणि स्वच्छतेचा प्रश्न लक्षात घेता, सर्व दुकानांवर समोरून आच्छादन लावून आतल्या आत व्यवहार होणे गरजेचे असल्याचे त्यांनी नमूद केले. या विषयावर पुढील आठ दिवसांत प्रशासनाकडून अहवाल मागवून तो स्थायी समितीपुढे अंतिम मान्यतेसाठी ठेवला जाईल. त्यामुळे संबंधित विभागाने कोणताही विलंब न लावता तत्काळ कार्यवाही सुरू करावी, असे त्यांनी स्पष्ट केले. केवळ मटण दुकानांचाच विषय नव्हे, तर संपूर्ण शहराची स्वच्छता, सुंदरता आणि राहण्यायोग्य वातावरण टिकवून ठेवण्यासाठी प्रशासन व लोकप्रतिनिधी या दोन चाकांनी समन्वयाने चालणे आवश्यक असल्याचे बारणे यांनी अधोरेखित केले.

किवळे प्रभागात कचऱ्याची दयनीय अवस्था

पिंपरी : दैनिक संध्या

पिंपरी-चिंचवड महापालिकेला स्वच्छतेचा पुरस्कार मिळत असताना दुसरीकडे रावेत, किवळे आणि विकासनगर परिसरात कचरा व्यवस्थापनाची अत्यंत दयनीय अवस्था असल्याचा मुद्दा शिवसेनेच्या नगरसेविका ऐश्वर्या तरस यांनी महापालिकेच्या महासभेत उपस्थित केला. प्रभाग क्रमांक १६ मध्ये तब्बल ७ ते ८ दिवस कचरा उचलण्यासाठी गाडी येत नसल्याने नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. या परिस्थितीवरून तरस यांनी सभागृहात तीव्र नाराजी व्यक्त केली. महासभेत प्रभाग क्रमांक १६ मधील नागरिकांच्या विविध प्रश्नांवर त्यांनी ठाम आणि आक्रमक भूमिका मांडली. यामध्ये प्रामुख्याने तीन महत्त्वाच्या विषयांकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यात आले. दुर्गा टेकडी आणि परिसराच्या पर्यावरणावर कोणतेही दुष्परिणाम होऊ नयेत, तसेच नागरिकांच्या आरोग्याशी कोणताही खेळ होऊ नये, यासाठी प्रस्तावित वेस्ट टू एनर्जी प्रकल्प राबवू नये, अशी ठाम भूमिका ऐश्वर्या तरस यांनी मांडली. पर्यावरणाचे रक्षण आणि नागरिकांचे आरोग्य यांना सर्वोच्च प्राधान्य देण्याची मागणी त्यांनी केली. महापालिकेला स्वच्छतेचा पुरस्कार मिळाला असला, तरी प्रभाग क्रमांक १६ मध्ये कचऱ्याची दयनीय अवस्था आहे. काही ठिकाणी सात ते आठ दिवस कचरा उचलण्यासाठी घंटागाडी येत नसल्याने कचऱ्याचे ढीग साचत आहेत. एका बाजूला स्वच्छतेचा पुरस्कार आणि दुसऱ्या बाजूला नागरिकांना भेडसावणारी अस्वच्छता, यातील विसंगती त्यांनी सभागृहात मांडली. पुरस्काराबद्दल महापौरांचे अभिनंदन करतानाच प्रत्यक्ष जमिनीवरील परिस्थितीकडेही लक्ष देण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली. चिकन वेस्टची वाहतूक करणाऱ्या वाहनांमधून रस्त्यावर कचरा सांडत असल्याने रावेत-किवळे परिसरात दुर्गंधी पसरत आहे. यामुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला असून, बेजबाबदारपणे वाहतूक करणाऱ्या वाहनांवर तातडीने कठोर कारवाई करावी, अशी मागणी तरस यांनी केली.

निगडी-पिंपरी मेट्रो मार्गावर सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर; नागरिकांचा जीव धोक्यात

पिंपरी : दैनिक संध्या

शहरात मेट्रोचे जाळे विस्तारत असताना निगडी ते पिंपरी मार्गावर सुरू असलेल्या कामाने सुरक्षिततेचे तीनतेरा वाजल्याचे चित्र आहे. उंचावर काम करणारे कर्मचारी हेल्मेटविना, क्रेनखाली सुरू असलेली नागरिकांची वर्दळ, रस्त्यावर उघड्या पडलेल्या सळ्या, वाकलेले पत्रे, तुटलेली चेंबर्स आणि महामार्गावर सांडणारे पाणी... अशा एक ना अनेक धोक्यांच्या गर्तेतून नागरिकांना रोजचा प्रवास करावा लागत आहे. मेट्रोचे काम सुरू असताना कामगारांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला असून, दुसरीकडे सर्वसामान्यांच्या जीवितालाही धोका निर्माण झाला आहे. निगडीत वाऱ्यामुळे मेट्रो पुलाचा पत्रा उडून दुचाकीस्वाराच्या अंगावर पडण्याची वेळ आली होती. सुदैवाने अनर्थ टळला. मात्र, त्या घटनेतूनही संबंधित यंत्रणांनी धडा घेतला की नाही, असा प्रश्न प्रत्यक्ष पाहणीतून समोर आलेल्या धोकादायक परिस्थितीमुळे उपस्थित होत आहे. मेट्रोच्या पुलावर अनेक फूट उंचीवर कर्मचारी काम करताना दिसतात. मात्र, या कामगारांपैकी काहींच्या डोक्यावर हेल्मेट नसल्याचे, तर काही जण आवश्यक सुरक्षा साधनांशिवाय काम करत असल्याचे चित्र आहे. उंचावर काम करताना सुरक्षिततेची साधने वापरणे ही प्राथमिक गरज असताना त्याकडेच दुर्लक्ष होत असल्याचे दिसते. कामगारांच्या सुरक्षेची जबाबदारी नेमकी कोणाची, असा प्रश्न यानिमित्ताने उपस्थित होत आहे. एखादी दुर्घटना घडल्यानंतरच सुरक्षा नियमांची आठवण होणार का? मेट्रोच्या कामासाठी हायड्रॉलिक क्रेन आणि अवजड यंत्रसामग्रीचा वापर केला जात आहे. मात्र, काही ठिकाणी क्रेनच्या खालीच नागरिकांची ये-जा सुरू असल्याचे दिसते.



वाकडमध्ये कंटेनर आणि कारचा भीषण अपघात; कार जळून खाक

■ वाकड(दै. संध्या)

पुणे-बेंगळुरू महामार्गावरील वाकड येथील भुजबळ चौकात मध्यरात्रीच्या सुमारास कंटेनर आणि कारचा भीषण अपघात झाला. या अपघातानंतर कारने अचानक पेट घेतल्याने संपूर्ण कार जळून खाक झाली. सुदैवाने या दुर्घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नसल्याची प्राथमिक माहिती आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मध्यरात्री सुमारे दीड वाजण्याच्या सुमारास भुजबळ चौक परिसरात कंटेनर आणि कारची जोरदार धडक झाली. धडकेची तीव्रता इतकी होती की, कारने तत्काळ पेट घेतला. आगीने काही क्षणांतच रौद्र रूप धारण केले आणि संपूर्ण कार आगीच्या भक्ष्यस्थानी पडली. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली. मात्र, या अपघातात सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नसल्याचे समजते. दरम्यान, अपघात नेमका कोणत्या कारणामुळे झाला, याबाबत अद्याप स्पष्ट माहिती समोर आलेली नाही. स्थानिक पोलिसांकडून घटनेचा पुढील तपास सुरू आहे.

जगताप डेअरी ते शिवार चौकापर्यंत ग्रेड सेपरेटर उभारा

वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी नगरसेविका अनिता काटे यांचे आयुक्तांना निवेदन

■ पिंपरी (दै. संध्या)

पिंपळे सौदागर परिसरातील वाढती वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी जगताप डेअरी चौकात प्रस्तावित असलेला ग्रेड सेपरेटर शिवार चौकापर्यंत विस्तारित करावा, अशी मागणी नगरसेविका अनिता संदीप काटे यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी महापालिका आयुक्तांना पत्र देऊन तांत्रिक सर्वेक्षण आणि व्यवहार्यता तपासणी करण्याची मागणी केली आहे.

पिंपळे सौदागरमधील शिवार चौक हा अत्यंत वर्दळीचा परिसर असून वाढती लोकसंख्या आणि वाहनांच्या संख्येमुळे येथे विशेषतः सकाळी व सायंकाळी मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होते. वाहनांच्या लांबच लांब रांगा लागत असल्याने नागरिकांना मनस्ताप सहन करावा लागतो.

जगताप डेअरी चौकातील प्रस्तावित ग्रेड सेपरेटरला जोडून शिवार चौकापर्यंत सुविधा निर्माण केल्यास संपूर्ण मार्गावरील





वाहतूक सुरळीत होण्यास मदत होईल. वाहनचालकांचा वेळ आणि इंधनाची बचत होण्यासह प्रवास अधिक सुरक्षित व जलद होईल, असे काटे यांनी पत्रात नमूद केले आहे. या कामासाठी आवश्यक वाहतूक अभ्यास, तांत्रिक सर्वेक्षण व व्यवहार्यता तपासणी करून विकास आराखड्यात कामाचा समावेश करावा. तसेच आवश्यक निधीची तरतूद करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे. केवळ एका चौकापुरता विचार न करता जगताप डेअरी ते शिवार चौक या संपूर्ण मार्गाचे एकात्मिक वाहतूक नियोजन करावे, अशी भूमिका अनिता काटे यांनी मांडली आहे.

कचऱ्याच्या भीषण परिस्थितीची जबाबदारीही स्वीकारा : कलाटे

■ पिंपरी(दै. संध्या)

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेला स्वच्छतेसाठी मिळालेल्या पुरस्काराबद्दल स्वच्छता आणि आरोग्य विभागातील कर्मचाऱ्यांचे अभिनंदन करतानाच, शहरातील सध्याच्या कचरा व्यवस्थापनाच्या परिस्थितीवर महापालिका प्रशासनाने आत्मपरीक्षण करण्याची गरज असल्याचे मत नगरसेवक राहुल कलाटे यांनी व्यक्त केले. पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या आज (२० नोव्हेंबर) आयोजित करण्यात आलेल्या सर्वसाधारण सभेत ते बोलत होते.

यावेळी राहुल कलाटे म्हणाले की, "पुरस्कारासाठी स्वतःची पाठ थोपटून घेताना शहरातील सध्याच्या कचऱ्याच्या परिस्थितीची जबाबदारीही स्वीकारावी लागेल. आजही वेस्ट टू एनर्जी प्रकल्प पूर्णपणे कार्यान्वित झालेला नाही. या प्रकल्पाशी संबंधित भागातील नगरसेवक



आंदोलन करत आहेत. शहरातील अनेक ठिकाणी कचऱ्याची परिस्थिती अत्यंत भीषण आहे. आमच्याकडे नवीन क्षेत्रीय कार्यालय देण्यात आले आहे; मात्र कचरा संकलनासाठी आवश्यक गाड्या आणि कर्मचारी अद्याप उपलब्ध करून देण्यात आलेले नाहीत. यासंदर्भात मी स्वतः महापालिका आयुक्तांकडे पत्रव्यवहार केला आहे. मात्र, आजपर्यंत कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही.

भारतीय संघात चमकलेल्या महाराष्ट्राच्या पाच कबड्डीपटूंचा भोसरीत गौरव

■ पिंपरी (दै. संध्या)

भारतीय कबड्डी संघात स्थान मिळवून देशासाठी उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या महाराष्ट्राच्या पाच कबड्डीपटूंचा भोसरीत विशेष सन्मान करण्यात येणार आहे. शिवम पठारे, शुभम शिंदे, आदित्य शिंदे, अजित पवार आणि पंकज मोहिते यांचा गौरव आमदार महेश लांडगे यांच्या हस्ते होणार आहे. 'धर्मवीर कबड्डी प्रीमियर लीग'च्या वतीने आयोजित हा सोहळा बापुजी बुवा चौकातील कै. मारुती रावजी लांडगे आंतरराष्ट्रीय कुस्ती संकुलात पार पडणार आहे.

भारतीय संघापर्यंत मजल मारणाऱ्या या खेळाडूंचा प्रवास नवोदित कबड्डीपटूंना प्रेरणा देणारा आहे. त्यांच्या कामगिरीचा गौरव करण्यासाठी आयोजित सोहळ्यास खेळाडू, प्रशिक्षक आणि कबड्डीप्रेमींनी उपस्थित राहावे, असे आवाहन



आयोजकांनी केले आहे. आमदार महेश लांडगे यांच्या संकल्पनेतून आणि पुणे जिल्हा कबड्डी असोसिएशनच्या मान्यतेने महेशदादा स्पोर्ट्स फाउंडेशनने पुणे जिल्ह्यातील खेळाडूंसाठी 'धर्मवीर कबड्डी प्रीमियर लीग'चे आयोजन केले आहे.

वायसीएम रुग्णालयातील १ कोटी ७२ लाखांचा निकृष्ट व विनापरवाना औषधसाठा जप्त; FDA ची मोठी कारवाई

■ पिंपरी (दै. संध्या)

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयातील (वायसीएम) सेंट्रल मेडिकल स्टोअरमध्ये अन्न व औषध प्रशासनाने (FDA) धडक कारवाई केली आहे. या कारवाईत तब्बल १ कोटी ७२ लाख रुपये बाजारमूल्य असलेला ॲलोपॅथिक औषधांचा साठा जप्त करण्यात आला आहे. या औषधांमध्ये निकृष्ट दर्जाची तसेच विनापरवाना उत्पादित औषधांचा समावेश असल्याचे तपासणीत निष्पन्न झाले आहे. या कारवाईमुळे महापालिकेच्या आरोग्य यंत्रणेत खळबळ उडाली आहे.

अन्न व औषध प्रशासनाच्या तपासणीत केअरझिंक, केअरगिल-२००, एलडीएलआर-५ आणि डोम्पेरिडोन यांसह काही औषधांच्या दर्जाबाबत गंभीर त्रुटी आढळून आल्या. तसेच काही औषधांच्या



पॅकिंगवर केवळ शासकीय पुरवठ्यासाठी असा उल्लेख असतानाही ती औषधे निकृष्ट दर्जाची आणि विनापरवाना उत्पादित असल्याचे स्पष्ट झाले.विशेष म्हणजे, औषधांच्या गुणवत्तेबाबत आधीच संशय निर्माण झाल्याने पिंपरी-चिंचवड महापालिकेने स्वतःहून अन्न व औषध प्रशासनाला याबाबत कळवले होते. त्यानंतर FDA ने तपासणी करून औषधसाठ्याच्या गुणवत्तेची पडताळणी केली. तपासणी अहवालानंतर प्रशासनाने संबंधित औषधसाठा जप्त करण्याची कारवाई केली.या प्रकरणात औषधांचा पुरवठा करणाऱ्या मे. श्री विनायक फार्मा कंपनीला महापालिकेच्या निविदा प्रक्रियेत सहभागी होण्यास प्रतिबंध करण्यात आला.

शहरातील ज्येष्ठ कलावंत सुहास दामोदर जोशी यांचा मानपत्र देऊन गौरव

■ पिंपरी (दै. संध्या)

पिंपरी-चिंचवड शहराच्या सांस्कृतिक जडणघडणीत मराठी रंगभूमी, लोककला आणि सांस्कृतिक चळवळीच्या माध्यमातून मोलाचे योगदान देणारे ज्येष्ठ कलावंत, अभिनेते व दिग्दर्शक सुहास दामोदर जोशी यांना आज पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेत महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते मानपत्र प्रदान करून सन्मानित करण्यात आले.

गेल्या तीन दशकांहून अधिक काळ सुहास जोशी यांनी मराठी रंगभूमी, लोकनाट्य, एकांकिका, निवेदन आणि विविध सांस्कृतिक उपक्रमांच्या माध्यमातून आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. ५० हून अधिक नाटके आणि ४० हून अधिक एकांकिकांमध्ये त्यांनी विविध भूमिका साकारल्या आहेत. ग्रामीण संस्कृतीचा अस्सल गंध, बोलीभाषेतील सहजता आणि व्यक्तिरेखांमधील वास्तवता ही त्यांच्या अभिनयाची वैशिष्ट्ये आहेत.



कामगार कल्याण नाट्यस्पर्धा, राज्य नाट्यस्पर्धा आणि विविध सांस्कृतिक महोत्सवांमधील त्यांच्या योगदानाची दखल घेत त्यांना ५० हून अधिक राज्यस्तरीय पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे. लोककला संमेलने, अभिजात मराठी सप्ताह तसेच कथाकथनाच्या माध्यमातून मराठी भाषा, साहित्य आणि लोकसंस्कृतीच्या संवर्धनासाठीही त्यांनी सातत्याने योगदान दिले आहे. गेल्या दहा वर्षांपासून राज्य नाट्यस्पर्धांचे परीक्षक म्हणून काम करत नवोदित कलाकारांना मार्गदर्शन करण्याचे कार्यही ते करत आहेत.

त्यांच्या प्रदीर्घ कलासाधनेचा, सांस्कृतिक क्षेत्रातील योगदानाचा आणि समाजप्रबोधनाच्या कार्याचा गौरव करणे ही पिंपरी-चिंचवड शहरासाठी अभिमानाची बाब आहे,त्यांच्या पुढील कला वाटचालीसाठी महापौर रवि लांडगे यांनी त्यांना मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.

याप्रसंगी उपमहापौर शर्मिला बाबर, अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम, स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे, सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, क्रीडा, कला, साहित्य व संस्कृती समितीचे सभापती कैलास कुटे, शिवसेना गटनेते विश्वजित बारणे, नगरसदस्य सुरेश भोईर, अनंत को-हाळे, नगरसदस्या मनिषा चिंचवडे तसेच अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम उपस्थित होते.मानपत्राचे वाचन जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांनी केले.

थोडक्यात पण महत्वाचे



धर्मशास्त्राला धरूनच तंत्रशास्त्राच्या माध्यमातून खंडोबा मंदिराचा विकास व्हावा!

पुरंदर : दैनिक संध्या

महाराष्ट्राचे कुलदैवत आणि राज्यातील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या जेजुरीच्या श्री खंडोबा मंदिराचा विकास करताना येथील शेकडो वर्षांच्या धार्मिक, आध्यात्मिक आणि सांस्कृतिक परंपरांचा आदर राखला जावा. धर्मशास्त्राला धरूनच आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून मंदिराचा आणि गडकोटाचा विकास करण्यात यावा, अशी आग्रही मागणी जेजुरी ग्रामस्थांनी केली आहे. मंदिराच्या ऐतिहासिक वास्तूंचे जतन, संवर्धन आणि दर्जेदार दुरुस्ती करताना स्थानिक ग्रामस्थ, नगरपालिका, देवस्थान संस्था आणि परंपरागत सेवेकऱ्यांना विश्वासात घ्यावे, अशी भूमिका ग्रामस्थ प्रतिनिधींनी पुरातत्त्व विभागाच्या अधिकाऱ्यांसमोर मांडली. जेजुरीच्या खंडोबा मंदिराला शेकडो वर्षांची धार्मिक, आध्यात्मिक आणि सांस्कृतिक परंपरा लाभली आहे. येथील यात्रा, उत्सव, सण, धार्मिक विधी आणि विविध रूढी-परंपरांच्या माध्यमातून गुरव, पुजारी, वीर, कोळी, घडशी, ब्राह्मण, ग्रामस्थ, खांदेकरी, मानकरी, सेवेकरी अशा अठरापगड जाती-धर्मांतील उपासकांनी ही मंदिर संस्कृती आजतागायत जतन केली आहे. या प्राचीन परंपरांच्या पाऊलखुणा मंदिराच्या स्थापत्यशास्त्रीय रचनेतून आजही स्पष्टपणे दिसून येतात. गडावरील प्रत्येक दगड या ऐतिहासिक वैभवाची साक्ष देत उभा आहे. सध्या शासनाच्या पुरातत्त्व विभागामार्फत विकास निधीतून खंडोबा गड, गडकोट, पायरी मार्ग, दर्शन मंडप तसेच विविध वास्तूंची डागडुजी आणि संवर्धनाची कामे आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून सुरू आहेत. मात्र, या कामांमध्ये काही ठिकाणी ऐतिहासिक वास्तूंचे मूळ दगड मजबूत आणि टिकाऊ असतानाही ते बदलून नवीन दगड वापरण्यात आल्याचा आक्षेप ग्रामस्थांनी घेतला आहे. काही कामांचा दर्जाही समाधानकारक नसल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. ऐतिहासिक वास्तूंचे मूळ स्वरूप कायम ठेवून पारंपरिक स्थापत्यकलेनुसारच त्यांची दुरुस्ती आणि संवर्धन व्हावे, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली. जेजुरीच्या नव्या गडापासून जुन्या कडेपठार मंदिरापर्यंतच्या पारंपरिक पालखी प्रदक्षिणा मार्गासह जेजुरी पंचक्रोशीतील ऐतिहासिक मूर्ती, वास्तू आणि छोटी मंदिरे यांचेही शास्त्रीय पद्धतीने जतन होणे आवश्यक आहे. या वारशाचे संरक्षण आणि संवर्धन करणे ही पुरातत्त्व विभागाची महत्त्वाची जबाबदारी असून, या कामांमध्ये होणारी दिरंगाई आणि कामांच्या दर्जाबाबत ग्रामस्थांनी नाराजी व्यक्त केली. यासंदर्भात छत्री मंदिर येथे ग्रामस्थ आणि पुरातत्त्व विभागाचे प्रमुख अधिकारी यांच्या नियोजित सुसंवाद बैठकीत जेजुरी नगराध्यक्ष जयदीप बारभाई आणि सामाजिक कार्यकर्ते हरिदास रत्नपारखी यांनी समस्त ग्रामस्थांच्या वतीने भूमिका मांडली. शासनाचे प्रशासन आणि देवस्थान समित्यांची सध्याची व्यवस्था अस्तित्वात येण्यापूर्वीपासूनच ग्रामस्थ, उपासक आणि भाविकांनी येथील धार्मिक, आध्यात्मिक व सांस्कृतिक परंपरा शेकडो वर्षे जतन केल्या आहेत. त्यामुळे मंदिराचा विकास करताना या परंपरागत ज्ञानाचा आणि स्थानिकांच्या अनुभवाचा विचार होणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

बारामतीत रविवारी 'बामसेफ' चे प्रशिक्षण शिबीर

बारामती: दैनिक संध्या



बामसेफ या सामाजिक संघटनेच्या वतीने येत्या रविवार दि.२२ नोव्हेंबर २०२६ रोजी एकदिवसीय प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.शहरातील माता रमाई भवन,आमराई या ठिकाणी सकाळी ११ ते सांय ६ यावेळेत हे प्रशिक्षण शिबीर पार पडणार आहे.बामसेफचे राष्ट्रीय प्रचारक डॉ.अमित नरवाडे हे या शिबिरासाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित राहणार आहेत. सध्या देशाच्या बदलत्या आणि आवाहनात्मक सामाजिक परिस्थितीत समाजाला योग्य दिशा देऊन वैचारिक दृष्ट्या प्रशिक्षित आणि जागरूक नागरिक तयार करणे हा या शिबिराचा मुख्य उद्देश असून या शिबिरामध्ये सर्व जाती धर्मातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन भारत मुक्ती मोर्चाचे राज्य कार्यकारणी सदस्य ॲड.सुशील अहिवळे यांनी केले आहे.

पोलिसांनी सिनेस्टाईल पाठलाग करून पकडले

वडगाव निंबाळकर : दैनिक संध्या

वडगाव निंबाळकर पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजिस्टर नंबर 127/2026 अन्वये दाखल असलेल्या POCSO गुन्ह्यातील आरोपी अमर सोमनाथ चव्हाण, वय-26, रा.वडगाव निंबाळकर, ता.बारामती,जि.पुणे हा गेल्या चार महिन्यांपासून पोलिसांना गुंगारा देत होता.आरोपी पोलिसांच्या हाती लागत नसल्याने त्याचा शोध सुरू असतानाच दिनांक 18 नोव्हेंबर 2026 रोजी आरोपी गावात आल्याची गोपनीय माहिती वडगाव निंबाळकर पोलिसांना मिळाली. मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी तात्काळ हालचाली करत सापळा रचला. यावेळी पोलिसांची चाहूल लागताच आरोपीने पळून जाण्याचा प्रयत्न केला.मात्र, पोलिसांनी सिनेस्टाईल पाठलाग करत त्याला शिताफीने पकडण्यात यश मिळवले.तब्बल चार महिन्यांपासून पोलिसांना गुंगारा देणाऱ्या आरोपीला अखेर पोलिसांनी बेड्या ठोकल्या. आरोपीला ताब्यात घेतल्यानंतर त्याची कसून चौकशी केली असता त्याने फलटण शहर पोलीस स्टेशन हद्दीत मोटारसायकल चोरी केल्याची माहिती उघड झाली.याप्रकरणी फलटण शहर पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजिस्टर नंबर 427/2026, bns कलम 303(2)अन्वये चोरीचा गुन्हा दाखल असून त्याच्याकडून टीव्हीएस कंपनीची TVS SPORT ही गाडी जप्त करण्यात आली आहे.

प्राथमिक शाळेच्या शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्षपदी सचिन रुपनवर यांची निवड

दापोडी : दैनिक संध्या



दापोडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदी सचिन सुखदेव रुपनवर यांची निवड करण्यात आली आहे. त्यांच्या निवडीमुळे शाळेच्या शैक्षणिक व सर्वांगीण विकासाला चालना मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. सचिन सुखदेव रुपनवर हे पत्रकारिता क्षेत्रात कार्यरत असून त्यांनी एम.ए. बी.एड. पर्यंत शिक्षण घेतले आहे. तसेच त्यांना अध्यापन क्षेत्रातील अनुभव असल्याने शाळेतील शैक्षणिक गुणवत्ता वाढविणे, विद्यार्थ्यांच्या अडचणी समजून घेणे, शाळेच्या भौतिक सुविधांमध्ये सुधारणा करणे तसेच शिक्षक, पालक व ग्रामस्थ यांच्यात समन्वय साधणे यासाठी त्यांच्या अनुभवाचा निश्चितच फायदा होणार आहे. शालेय व्यवस्थापन समितीच्या माध्यमातून शाळेचा सर्वांगीण विकास, विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण, शैक्षणिक सुविधा आणि विविध उपक्रम राबविण्यासाठी प्रामाणिकपणे प्रयत्न करणार असल्याचे नवनिर्वाचित अध्यक्ष सचिन सुखदेव रुपनवर यांनी सांगितले.

शरयु फाउंडेशनचा बारामती तालुक्यात आरोग्यसेवेचा नवा संकल्प!

ग्रामीण भागातील नागरिकांसाठी मोफत फिरता दवाखाना सुरू; युगेंद्र पवार यांच्या हस्ते रुग्णवाहिकेचे उद्घाटन



■ बारामती (दै. संध्या)

ग्रामीण भागातील सर्वसामान्य नागरिकांना दर्जेदार आरोग्य सुविधा त्यांच्या गावाच्या दारात उपलब्ध करून देण्याच्या सामाजिक बांधिलकीतून शरयु फौंडेशन बारामती यांच्या वतीने तालुक्यात मोफत फिरता दवाखाना सुरू करण्यात येत आहे.या उपक्रमासाठी सज्ज करण्यात आलेल्या विशेष दोन रुग्णवाहिकेचे उद्घाटन राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष – शरदचंद्र पवार पक्षाचे युवा नेते श्री. युगेंद्रदादा पवार यांच्या हस्ते करण्यात आले.

शरयु फौंडेशनच्या माध्यमातून सामाजिक विकास, आरोग्य, शिक्षण, जलसंधारण महिला सक्षमीकरण, युवकांचे सबलीकरण तसेच ग्रामीण भागातील गरजू आणि वंचित घटकांना मदतीचा हात देण्याच्या उद्देशाने विविध सामाजिक उपक्रम राबविण्यावर भर दिला जात आहे. समाजातील शेवटच्या घटकापर्यंत विकासाच्या आणि सुविधांच्या संधी पोहोचाव्यात,हा फौंडेशनच्या कार्याचा केंद्रबिंदू आहे. केवळ मदत करण्यापुरते मर्यादित न राहता लोकांच्या दैनंदिन जीवनात सकारात्मक बदल घडविणारे उपक्रम राबविण्याचा फौंडेशनचा प्रयत्न आहे.

याच सामाजिक दृष्टिकोनातून ग्रामीण आरोग्याचा महत्त्वपूर्ण प्रश्न लक्षात घेऊन मोफत फिरत्या दवाखान्याचा उपक्रम हाती घेण्यात आला आहे. ग्रामीण भागातील अनेक नागरिकांना अंतर, आर्थिक परिस्थिती, वेळेचा अभाव आणि आरोग्य सुविधांच्या मर्यादित उपलब्धतेमुळे वेळेवर वैद्यकीय तपासणी करून घेता येत नाही.विशेषतः ज्येष्ठ नागरिक, महिला,शेतकरी,शेतमजूर आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना याचा अधिक त्रास सहन करावा लागतो. ही अडचण दूर करण्यासाठी आता वैद्यकीय सेवा थेट गाव वाडी वस्तीवर पोहोचणार आहे.या फिरत्या दवाखान्याच्या माध्यमातून तज्ज्ञ डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली गावोगावी नागरिकांची नियमित आरोग्य तपासणी करण्यात येणार आहे. यामध्ये रक्तदाब (बीपी),मधुमेह (शुगर) तपासणी,सामान्य आजारांवर प्राथमिक उपचार, आवश्यक आरोग्यविषयक सल्ला, आजारांचे प्राथमिक निदान,गंभीर आजारांच्या रुग्णांना पुढील उपचारांसाठी योग्य मार्गदर्शन तसेच आरोग्यविषयक जनजागृती अशा सेवा मोफत उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.विशेषतः ग्रामीण भागातील ज्येष्ठ नागरिक,महिला आणि नियमित आरोग्य तपासणीपासून वंचित राहणाऱ्या नागरिकांना या उपक्रमाचा मोठा फायदा होणार आहे. आजार बळावण्यापूर्वी त्याचे निदान व्हावे,नागरिकांमध्ये आरोग्याबाबत जागरूकता निर्माण व्हावी आणि वेळेवर उपचार मिळावेत,हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश आहे.

यावेळी युगेंद्रदादा पवार यांनी शरयु फौंडेशनच्या या उपक्रमाचे कौतुक करत बारामती तालुक्यातील नागरिकांनी या मोफत आरोग्य सेवेचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन केले.आपल्या कुटुंबातील ज्येष्ठ नागरिक, महिला आणि गरजू व्यक्तींनाही या सेवेचा लाभ मिळवून द्यावा.आरोग्य हीच खरी संपत्ती असून ग्रामीण भागातील प्रत्येक नागरिकाला आरोग्य सुविधा मिळणे आवश्यक आहे,अशी भावना त्यांनी व्यक्त केली.

शरयु फौंडेशनचा हा उपक्रम म्हणजे सामाजिक बांधिलकीतून आरोग्यसेवेचे गावोगावी पोहोचणारे एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरणार आहे. 'निरोगी गाव,सुदृढ समाज' या संकल्पनेतून सुरू झालेला हा फिरता दवाखाना बारामती तालुक्यातील ग्रामीण नागरिकांसाठी आरोग्याचा विश्वासाचा आधार बनेल,असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

पारधी समाजासाठी स्वतंत्र प्रकल्प कार्यालय सुरू करण्याची मागणी

■ कोरेगावमुळ (दै. संध्या)

धरती आबा क्रांतिवीर भगवान बिरसा मुंडा यांच्या १५१ व्या जयंतीनिमित्त पुण्यातील लोकशाहीर अण्णाभाऊ साठे सभागृहात आदिवासी प्रकल्प कार्यालय, घोडेगाव आणि शेवराई सामाजिक संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने आदिवासी पारधी मेळाव्याचे उत्साहात आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्यात विकासाच्या मुख्य प्रवाहापासून अद्यापही वंचित असलेल्या पारधी समाजाच्या विविध प्रश्नांवर चर्चा करण्यात आली. तसेच समाजाच्या शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक प्रगतीसाठी आवश्यक उपाययोजनांबाबत विचारमंथन करण्यात आले.

घोडेगाव, शिरुर आणि पुणे परिसरात आयोजित विविध उपक्रमांच्या माध्यमातून पारधी समाजाच्या शैक्षणिक, सामाजिक आणि प्रशासकीय समस्यांना वाचा फोडण्यात आली. यावेळी पारधी समाजातील महिला व युवकांनी सादर केलेल्या पारंपरिक आदिवासी नृत्याने उपस्थितांची मने जिंकली आणि कार्यक्रमाची रंगत वाढवली. पारधी समाजाच्या गावनिहाय सर्वेक्षणाचा प्रश्न मार्गी लावून प्रत्येक गावातील कुटुंबांना न्याय मिळवून देण्यासाठी लवकरात लवकर कार्यवाही करण्यात येईल. समाजातील प्रत्येक कुटुंबातील व्यक्तीला न्याय मिळवून देण्यासाठी सकारात्मक प्रयत्न केले जातील, असे आश्वासन आमदार बापूसाहेब पठारे यांनी यावेळी दिले.

दरम्यान, पारधी समाजाच्या विकासासाठी पुणे येथे स्वतंत्र आदिवासी पारधी प्रकल्प कार्यालय सुरू करण्यात यावे, अशी महत्त्वपूर्ण मागणी यावेळी करण्यात आली.

समाजाच्या विविध प्रलंबित प्रश्नांचे गांभीर्य लक्षात घेता अशा महत्त्वपूर्ण मेळाव्यांना जिल्ह्यातील मंत्री, लोकप्रतिनिधी तसेच जिल्हा नियोजन विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांची उपस्थिती अपेक्षित होती. मात्र, संबंधित मान्यवरांची अनुपस्थिती प्रकर्षाने जाणवली.

याबाबत समाजसेवक नामदेव भोसले यांनी खंत व्यक्त करत समाजाच्या प्रश्नांकडे शासन आणि प्रशासनाने गांभीर्याने लक्ष देण्याची आवश्यकता अधोरेखित केली. या कार्यक्रमाला आमदार बापूसाहेब पठारे, आदिवासीसेवक नामदेव भोसले, प्रकल्प अधिकारी गणेश इनवते, गणेश गावडे, सुनील काळे, सामाजिक कार्यकर्ते जितेंद्र काळे, कुणाल भोसले, बलवार पवार आदी मान्यवर उपस्थित होते.



यावेळी अश्विनी तुषार भोसले, लोण्या काळे, सौरभ सुभाष काळे, येलीजा इनवर भोसले, आदर्श पत्रकार सुनील ज्ञा. भोसले यांच्यासह अनिल काळे-कल्पना काळे, बलवार पवार-आश्विसना पवार, दिलीप भोसले-ललिता भोसले, जालिंदर भोसले-मंजुळा भोसले, विषय काळे-वनिता काळे, पटबई भोसले-सारिका भोसले या गुणवंत व्यक्ती आणि आदर्श माता-पित्यांचा सन्मान करण्यात आला. पारधी समाजाची कला, संस्कृती आणि गुणवत्ता जोपासण्याबरोबरच समाजातील गुणवंतांना प्रोत्साहन देऊन त्यांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचा सकारात्मक संदेश या मेळाव्याच्या माध्यमातून देण्यात आला.

गुरू गोरक्षनाथ प्रकट दिनानिमित आरोग्य शिबिर

■ जेजुरी (दै. संध्या)



गुरु गोरक्षनाथ प्रकट दिनानिमित श्री गुरू गोरक्षनाथ दिग्विजयनाथ आश्रम ट्रस्ट व डॉ म्हस्के हॉस्पिटल यांच्या वतीने रविवार दि 22 रोजी आळंदी येथील आश्रमात मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

आळंदी येथील साई बाबा मंदिरा शेजारी असणाऱ्या गुरू गोरक्षनाथ आश्रमात दरवर्षी गुरू गोरक्षनाथ प्रकट दिन धार्मिक उपक्रमांनी साजरा केला जातो. रविवार दि 22 रोजी प्रकट दिनानिमित पूजा अभिषेक, भजन कीर्तन महाप्रसाद या बरोबरच डॉ म्हस्के हॉस्पिटलच्या वतीने मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरात हिमोग्लोबीन, रक्तदाब, हाडांची घनता, पित्ताशय, हार्निया, मूत्रपिंड, पोटाचे आजार याबाबत तपासणी व मोफत औषध वाटप करण्यात येणार आहे. या शिबिराचा फायदा भाविकांनी घ्यावा असे आवाहन या आश्रमाचे महंत योगी दिग्विजयनाथ महाराज यांनी केले आहे.

कोलवडी येथे छठ पूजा महापर्व श्रद्धा आणि उत्साहात साजरे

माजी उपसरपंच रमेशभाऊ मदने मित्र परिवाराच्या वतीने आयोजन

■ कोरेगावमुळ (दै. संध्या)



उत्तर भारतीय बांधवांसाठी अत्यंत पवित्र आणि श्रद्धेचे प्रतीक असलेला छठ पूजा महापर्व कोलवडी (मदने वस्ती) येथे मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. छठ पूजा उत्सव समिती, कोलवडी व माजी उपसरपंच रमेशभाऊ मदने मित्र परिवार यांच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

सूर्यदेव आणि छठी मातेची उपासना करून कुटुंबाच्या सुख-समृद्धीसह सर्वांच्या कल्याणासाठी प्रार्थना करण्याची या सणाची परंपरा आहे. या निमित्ताने आयोजित कार्यक्रमात उत्तर भारतीय बांधवांनी मोठ्या श्रद्धेने सहभाग नोंदविला. पारंपरिक धार्मिक विधी, भक्तिमय वातावरण आणि सामूहिक सहभागामुळे परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. चार दिवस चालणाऱ्या या पवित्र व्रताची सांगता सकाळी उगवत्या सूर्यदेवाला अर्घ्य अर्पण करून करण्यात आली. या महापर्वाच्या माध्यमातून भारतीय संस्कृती, धार्मिक परंपरा, निसर्गाप्रती कृतज्ञता आणि सामाजिक एकोप्याचे सुंदर दर्शन घडले. यावेळी माजी उपसरपंच रमेशभाऊ मदने यांनी उपस्थित उत्तर भारतीय बांधवांना छठ पूजेच्या शुभेच्छा देत सर्वांच्या जीवनात सुख, शांती, आरोग्य आणि समृद्धी नांदो, अशी सदिच्छा व्यक्त केली. विविध प्रांतांतील नागरिकांनी एकत्र येऊन सण-उत्सव साजरे केल्याने सामाजिक सलोखा आणि बंधुभाव अधिक दृढ होतो, असेही यावेळी नमूद करण्यात आले. या प्रसंगी रविंद्र प्रसाद, साकेंद्र मिस्री, रंजीत राम, दीपक सिंग, महेंद्र सिंह, सुनील शर्मा, देवेंद्र यादव, विनोद सहानी यांच्यासह कोलवडी परिसरातील उत्तर भारतीय बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. श्रद्धा, भक्ती, संस्कृती आणि सामाजिक एकोप्याचा सुंदर संगम ठरलेल्या या छठ पूजा महापर्वाची सांगता भक्तिमय वातावरणात झाली.

ह.भ.प. संजय सावंत यांना 'आदर्श हरिभक्त पारायण' पुरस्कार प्रदान

■ जेजुरी (दै. संध्या)



श्रीक्षेत्र जेजुरी येथील अहिल्यादेवी होळकर विठ्ठल मंदिरातील ज्ञानराज भजनी मंडळाच्या वतीने सामाजिक कार्यकर्ते ह.भ.प. संजय सावंत यांना 'आदर्श हरिभक्त पारायण' पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. ज्ञानराज भजनी मंडळाचे संस्थापक अध्यक्ष ह.भ.प. यशवंत भालेराव महाराज आणि जेजुरी नगरपरिषदेचे माजी उपनगराध्यक्ष हरिदास भोसले यांच्या शुभहस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

ह.भ.प. संजय सावंत हे गेल्या २५ ते २७ वर्षांपासून धार्मिक आणि सामाजिक क्षेत्रात सातत्याने कार्यरत आहेत. विशेषतः सामाजिक प्रबोधन, व्यसनमुक्ती आणि समाजहिताच्या विविध उपक्रमांमध्ये त्यांचे मोलाचे योगदान आहे. त्यांच्या या दीर्घकालीन सामाजिक कार्याची दखल घेऊन ज्ञानराज भजनी मंडळाच्या वतीने त्यांना या पुरस्काराने गौरविण्यात आले.

यावेळी बोलताना ह.भ.प. यशवंत भालेराव महाराज यांनी संजय सावंत यांच्या सामाजिक व धार्मिक क्षेत्रातील योगदानाचे कौतुक केले. समाजामध्ये चांगले विचार रुजविण्यासाठी आणि व्यसनमुक्तीचा संदेश पोहोचविण्यासाठी कार्य करणाऱ्या व्यक्तींचा सन्मान होणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

जेजुरी नगरपरिषदेचे माजी उपनगराध्यक्ष हरिदास भोसले यांनीही संजय सावंत यांच्या अनेक वर्षांच्या सामाजिक कार्याचा गौरव केला. समाजहितासाठी निःस्वार्थपणे कार्य करणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्यांचा सन्मान करणे ही भजनी मंडळासाठी आनंदाची व अभिमानाची बाब असल्याचे त्यांनी नमूद केले. या कार्यक्रमास ह.भ.प. महेंद्र लोणकर, ह.भ.प. रमेश सोनवणे, ह.भ.प. नामदेव शेरे, ह.भ.प. किसनराव मंडलिक, ह.भ.प. राहुल बयास, ह.भ.प. वनारसे महाराज, खुडे महाराज, ह.भ.प. ज्योतीताई खुडे, काळाणे ताई, बोधले ताई, गरुड ताई, मुक्ता बारभाई, राधिका बारभाई, सोनवणे ताई यांच्यासह अनेक विठ्ठलभक्त उपस्थित होते.

ह.भ.प. संजय सावंत यांना हा पुरस्कार मिळाल्याबद्दल जिजामाता हायस्कूल व ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य, राष्ट्रपती पुरस्कारप्राप्त प्राचार्य नंदकुमार सागर, मार्तंड देव संस्थांनचे मा. विश्वस्त,पत्रकार नितीन राऊत, प्रल्हाद गिरमे सर, ह.भ.प. बाळाजी मोहरकर, माजी नगरसेवक श्यामकाका पेशवे, वरद क्लिनिकच्या डॉ. गौतमी गिरमे, माजी नगरसेवक मच्छिंद्र आप्पा बयास, सामाजिक कार्यकर्ते बबनभाऊ वायाळ, माजी नगरसेवक बाळासाहेब दरेकर, सामाजिक कार्यकर्ते संतोष दरेकर, माजी नगराध्यक्ष मोहनशेठ महाजन यांच्यासह अनेक मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील सामाजिक कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाचे नियोजन ज्ञानराज भजनी मंडळाचे संस्थापक अध्यक्ष ह.भ.प. यशवंत भालेराव महाराज यांनी केले, तर आभार ह.भ.प. नामदेव शेरे पाटील यांनी मानले.

धार्मिक निष्ठा, सामाजिक बांधिलकी, समाजप्रबोधनाची तळमळ आणि व्यसनमुक्तीच्या कार्यातून समाजाला सकारात्मक दिशा देणारे सामाजिक कार्यकर्ते ह.भ.प. संजय सावंत यांचा हा सन्मान जेजुरीच्या धार्मिक व सामाजिक क्षेत्रातील कार्याची दखल घेणारा ठरला.

थोडक्यात पण महत्वाचे



सात दशकांनंतर रस्त्याच्या कामाला सुरुवात

नारायणगाव : दैनिक संध्या

जुन्नर तालुक्यातील आणे ते भट्टीमळा या रस्त्याचा गेल्या सुमारे ७० वर्षांपासून प्रलंबित असलेला प्रश्न अखेर मार्गी लागला आहे. ग्रामपंचायतीच्या पुढाकाराने आणि शेतकऱ्यांनी दाखविलेल्या सामंजस्यामुळे गुरुवारी या रस्त्याच्या कामाला सुरुवात झाली. शेतकऱ्यांनी स्वेच्छेने आपल्या शेतजमिनीतील जागा रस्त्यासाठी उपलब्ध करून दिल्याने अनेक वर्षांपासून रखडलेल्या कामाचा मार्ग मोकळा झाला आहे. या रस्त्यासाठी कदम, वाबळे, जकाते, आहेर, गोफणे ,दाते आणि शिंदे या शेतकऱ्यांनी सर्व्हे क्रमांकानुसार जागा दिली. त्यामुळे परिसरातील शेतकऱ्यांना शेतमालाची वाहतूक तसेच दैनंदिन ये-जा करणे अधिक सोयीचे होणार आहे. या कामासाठी सरपंच प्रियांका दाते, उपसरपंच सुहास आहेर आणि ग्रामपंचायत सदस्या ज्योती अजित आहेर यांनी विशेष पुढाकार घेतला. तसेच पुष्पलता भास्कर आहेर यांचेही सहकार्य लाभले. महसूल विभागानेही रस्त्याचा प्रश्न सोडविण्यासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. गावाच्या विकासासाठी शेतकऱ्यांनी वैयक्तिक हितापेक्षा सार्वजनिक हिताला प्राधान्य देत जागा उपलब्ध करून दिली. त्यामुळे सात दशकांपासून प्रलंबित असलेला रस्त्याचा प्रश्न सुटण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल पडले असून परिसरातील नागरिक व शेतकऱ्यांकडून समाधान व्यक्त केले जात आहे.

विजयस्तंभ अभिवादन कार्यक्रमाच्या पार्श्वभूमीवर सोमवारी बैठक

पुणे: दैनिक संध्या

आगामी दिनांक १ जानेवारी २०२७ रोजी साजरा होणाऱ्या विजयस्तंभ अभिवादन कार्यक्रमाच्या नियोजनाच्या अनुषंगाने विविध सामाजिक संघटनांच्या प्रतिनिधींची बैठक उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी हवेली, पुणे यांच्या कार्यालयात आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीस संघटनांच्या प्रतिनिधींनी सोमवार, दिनांक २३ नोव्हेंबर २०२६ रोजी दुपारी ३.३० वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सामाजिक न्याय भवन, सर्व्हे नंबर १०४/१०५, विश्रांतवाडी पोलीस स्टेशन समोर आळंदी रोड, येरवडा पुणे येथे सर्व सामाजिक व राजकीय संघटनांच्या प्रतिनिधींनी बैठकीस उपस्थित राहून आपापल्या सूचना मांडाव्यात, असे आवाहन उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी डॉ.यशवंत माने यांनी केले आहे.

१९ हजार एकर क्षेत्रासाठी ज्वारी बियाणे तर ६ हजार एकर क्षेत्रासाठी मोफत हरभरा बियाणाचा कृषी विभागाकडून पुरवठा

पुणे : दैनिक संध्या

पुणे जिल्ह्यात कृषी विभागाकडून जिल्ह्यातील १३ तालुक्यातील शेतकऱ्यांना राष्ट्रीय अन्नसुरक्षा पोषण अभियान योजनेअंतर्गत ज्वारी पिकाच्या फुले यशोमती या वाणाचे १९ हजार ७५५ एकर क्षेत्रासाठी मोफत बियाणे पुरवठा करण्यात आला आहे. बियाणे वाटप करण्यात आलेल्या बहुतांश ठिकाणी पेरणी पूर्ण झाली आहे. चालू वर्षी दुष्काळी परिस्थिती असल्यामुळे जनावरांच्या चाऱ्याचा मोठा प्रश्न निर्माण होऊ शकतो या पार्श्वभूमीवर कृषी विभागाकडून मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांना मोफत बियाणे पुरवठा करण्यात आला आहे. यामुळे रब्बी हंगामात विहिरी, कॅनॉल, तलाव बोअरवेल या ठिकाणी पाणी उपलब्ध होऊ शकते अशा ठिकाणी ज्वारी पिकाची पेरणी केल्यानंतर त्यास २ ते ३ संरक्षित पाणी मिळाले तर ज्वारीचे धान्याचे उत्पादन होईल तसेच जनावरांसाठी मोठ्या प्रमाणात कडबा उपलब्ध होईल, यामुळे चारा टंचाईचा प्रश्न देखील निकाली निघू शकतो. शेतकऱ्यांना अजून १० हजार एकर क्षेत्रावर मोफत बियाणाचा पुरवठा करण्याचे नियोजन कृषी विभागाकडून सुरू असून, सदर बियाणे येत्या २ ते ३ दिवसात शेतकऱ्यांना वाटप करण्यात येणार आहे तरी ज्या शेतकऱ्यांना ज्वारी पिकाची पेरणी करायची आहे अशा शेतकऱ्यांनी महाडीबीटी पोर्टलवर मोठ्या प्रमाणात अर्ज करावेत असे आवाहन करण्यात आले आहे. रब्बी हंगामात पुणे जिल्ह्यात हरभरा हे प्रमुख पीक आहे. हरभरा पिकास कमी प्रमाणात पाणी लागते. २ ते ३ वेळेस पाणी दिल्यास हरभरा पीकाचे उत्पादन चांगले येते व जमिनीचा पोत देखील सुधारतो. हरभरा कमी पाण्यात येणारे पीक असल्यामुळे शेतकऱ्यांचा हरभरा पिकास चालू वर्षी मोठ्या प्रमाणात पसंती आहे. ज्या ठिकाणी ऊस तुट्टून जात आहे व उन्हाळ्यात पाण्याची कमतरता भासू शकते अशा ठिकाणी उसाचा खोडवा न राखता हरभरा पीक केल्यास, पीक फेरपालट होऊन बेवडदेखील होतो व जमिनीचा पोत सुधारण्यास मदत होते तसेच पुढील पीक चांगल्या प्रमाणात घेता येते. याकरिता चालू रब्बी हंगामात कृषी विभागाने जिल्ह्यात जवळपास ६ हजार ३२० एकर क्षेत्रासाठी हरभऱ्याचे मोफत बियाणे वाटप केले आहे. तसेच यापुढे शेतकऱ्यांच्या मागणीनुसार हरभरा बियाण्याचे महाडीबीटी पोर्टलवर प्रमाणित बियाणे या घटकासाठी अर्ज न करता मिनीकिट या घटकासाठी अर्ज करावेत, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी वैभव तांबे यांनी केले आहे.

चाकण पंचक्रोशीत गुलाबी थंडीची चाहूल

चाकण : दैनिक संध्या

चाकण व पंचक्रोशीत गुलाबी थंडीची चाहूल जाणवायला लागली आहे. गेल्या काही दिवसांपासून दिवसा कडक ऊन आणि रात्री व पहाटे हवेत गारवा अशी स्थिती अनुभवायला मिळत होती. शहर व परिसरात थंडीचा जोर हळूहळू वाढू लागला असून, सकाळच्या सत्रात तालुक्याच्या विविध भागांत धुक्याची चादर आणि थंड वाऱ्याची झुळूक जाणवत आहे. वातावरणातील या बदलामुळे चाकण शहरासह ग्रामीण भागातील नागरिकांना हुडहुडी भरू लागली आहे. सकाळी मॉर्निंग वॉकला जाणाऱ्यांची संख्या वाढली असून, लहान मुले आणि ज्येष्ठ नागरिकांनी उबदार कपड्यांचा वापर सुरू केला आहे. अनेक ठिकाणी सकाळी आणि संध्याकाळी शेकोट्या पेटवून ऊब घेताना नागरिक दिसत आहेत. शेती आणि पिकांच्या दृष्टीने ही थंडी दिलासादायक आहे. गुलाबी थंडीची ही सुरुवात रब्बी हंगामातील पिकांसाठी पोषक मानली जात आहे. हरभरा, गहू, ज्वारी तसेच विविध भाजीपाल्याच्या पिकांना या गारव्याचा फायदा होण्याची शक्यता येथील शेतकरी विकास धाडगे, शिवाजी धाडगे व साहेबराव कड यांनी व्यक्त केली आहे. थंडीमुळे पिकांची वाढ चांगली होईल, अशी आशा बळीराजाला वाटत आहे. एकीकडे थंडीचा आनंद घेतला जात असला, तरी बदलत्या वातावरणामुळे सर्दी, खोकला आणि तापासारख्या आजारांचा धोका वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे नागरिकांनी आरोग्याची काळजी घ्यावी आणि उबदार कपडे वापरावेत, असे आवाहन डॉ. प्रज्ञा भवारी, डॉ. अश्विनी गेठे, डॉ. असित अरगडे, डॉ. अजित गेठे आदींनी केले आहे.

भव्य बक्षीस वितरण व सत्कार समारंभ उत्साहात संपन्न!

■ पुणे (दै. संध्या)

हॅपी टू हेल्प संस्था पुणे, लोकहित युवा एकता संघटना व श्री स्वामी समर्थ सेवा फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित किल्ले स्पर्धांचे २०२६ चा भव्य बक्षीस वितरण समारंभ भवानी पेठ टिंबर मार्केट येथील सावित्रीबाई फुले सांस्कृतिक भवनामध्ये उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

छत्रपती शिवाजी महाराजांचा जाज्वल्य इतिहास, गड-किल्ल्यांची परंपरा आणि महाराष्ट्राचा ऐतिहासिक वारसा नव्या पिढीपर्यंत पोहोचावा, तसेच मुलांमध्ये इतिहासाविषयी अभिमान व किल्ले निर्मितीची आवड निर्माण व्हावी, या उद्देशाने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

या स्पर्धेमध्ये भवानी पेठेतील हरकानगर व काशेवाडी परिसरातील सहभागी बालस्पर्धकांनी अतिशय सुंदर आणि आकर्षक किल्ल्यांची निर्मिती केली. या सर्व स्पर्धकांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह प्रमाणपत्र व बक्षिसे देऊन गौरव करण्यात आला. 180 पेक्षा जास्त स्पर्धकांनी या स्पर्धेमध्ये सहभाग घेतला होता.



माजी आमदार मोहनदादा जोशी, मेहतर वाल्मिकी महासंघाचे प्रदेशाध्यक्ष रवी परदेशी, कसबा पेठ क्षेत्रीय कार्यालयाचे सहाय्यक आयुक्त तिमय्या जंगले, नगरसेवक महेश दादा पुंडे, कणव वसंतराव चव्हाण विश्वस्त विद्यार्थी सेवा संघ, उद्योजक गोविंद भिसे, समता सामाजिक संस्थेचे अध्यक्ष विजय भोसले, साजिद शेख ,वंदनाताई शिरसागर, हरिष करोते पंकज बांबोरी, महिंद्र मोगल, राखी ताई वाल्मीकी करोते, रफिक शेख, अक्षय वाघेला, संजय वाघमारे, सतिश आल्हाट आदी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विनोद निनारीया व राजेश गाडे यांनी केले.

दुष्काळ निवारणासाठी शासन कटिबद्ध; निधी कमी पडू देणार नाही!

पाणीटंचाईवर मात करण्यासाठी ऑगस्ट २०२७ पर्यंतचे नियोजन; उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांचे निर्देश

■ नांदेड (दै. संध्या)

जिल्ह्यातील संभाव्य दुष्काळ आणि पाणीटंचाईचा सामना करण्यासाठी प्रशासनाने आतापासूनच प्रभावी नियोजन करावे.सर्व शासकीय विभागांनी परस्पर समन्वयाने काम करून नागरिकांना कोणत्याही परिस्थितीत त्रास होणार नाही, याची दक्षता घ्यावी.दुष्काळ निवारणासाठी निधी कमी पडू दिला जाणार नाही,अशी ग्वाही उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी आज येथे दिली.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित आढावा बैठकीत त्यांनी जिल्ह्यातील दुष्काळ,पाणीटंचाई आणि चारा उपलब्धतेचा सविस्तर आढावा घेतला.यावेळी सहकारमंत्री बाबासाहेब पाटील,आमदार प्रतापराव पाटील-चिखलीकर,आमदार भीमराव केराम,प्र.जिल्हाधिकारी डॉ.रत्नदीप गायकवाड,जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील,पोलीस अधीक्षक डॉ.नीलभ रोहन,मनपा आयुक्त



डॉ.महेशकुमार डोईफोडे यांच्यासह विविध विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

यावेळी उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी ऑगस्ट २०२७ पर्यंतचा सर्वसमावेशक पाणीपुरवठा आराखडा तयार करण्याचे निर्देश दिले.टंचाईग्रस्त गावांना आवश्यकतेनुसार तातडीने टँकर मंजूर करावेत.यामध्ये कोणताही विलंब किंवा हयगय होता कामा नये.प्रत्येक तालुक्यासाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांची नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती करावी. तसेच जिल्हास्तरावर चोवीस तास कार्यरत नियंत्रण कक्ष स्थापन करून सक्षम अधिकाऱ्यांची नेमणूक करावी,असेही त्यांनी स्पष्ट केले.दुष्काळ निवारणाच्या उपाययोजना निधीअभावी प्रलंबित राहू नयेत. १९ नोव्हेंबर २०२६ च्या शासन निर्णयानुसार जिल्हा वार्षिक योजनेतील (डीपीसी) निधीचा योग्य वापर करावा. 'डीपीसी' मधून निधी देणे शक्य नसलेल्या कामांचे प्रस्ताव तातडीने शासनाकडे पाठवावेत,अशा सूचना त्यांनी दिल्या. चारा टंचाईवर उपाययोजना करताना ज्या शेतकऱ्यांकडे पाणी उपलब्ध आहे,त्यांना चारा पिकांचे बियाणे वितरित करावे. या शेतकऱ्यांकडून शासन योग्य दराने चारा खरेदी करणार असल्याची माहिती त्यांच्यापर्यंत पोहोचवून त्याबाबत व्यापक प्रचार-प्रसिद्धी करावी,असेही उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी सांगितले.

फिटकू ठरला फेमिना मिस इंडिया महाराष्ट्र 2027 चा अधिकृत हायजीन पार्टनर

■ मुंबई(दै. संध्या)

भारताचा पहिला तुरटी-आधारित पर्सनल केअर आणि हायजीन ब्रँड फिटकू ने फेमिना मिस इंडिया महाराष्ट्र 2027 सोबत अधिकृत हायजीन पार्टनर म्हणून भागीदारी केली आहे. देशातील प्रमुख सौंदर्य आणि सौंदर्य स्पर्धा व्यासपीठांपैकी एकावर वैयक्तिक स्वच्छता आणि दैनंदिन सेल्फ-केअरशी संबंधित विषयांना प्राधान्य देण्याच्या दिशेने हे एक पाऊल आहे. याच्या माध्यमातून वैयक्तिक स्वच्छता आणि दैनंदिन काळजीबाबत जागरूकता वाढवली जाईल.

ही भागीदारी फेमिना मिस इंडिया महाराष्ट्र 2027 च्या संपूर्ण प्रवासादरम्यान सुरू राहील, ज्यामध्ये ऑडिशन, स्पर्धकांसोबतचा संवाद, उपांत्य फेरी आणि ग्रँड फिनाले अशा टप्प्यांचा समावेश असेल. या सहकार्याच्या माध्यमातून फिटकूचा उद्देश वैयक्तिक स्वच्छतेबाबत जागरूकता वाढवणे आणि स्पर्धकांसोबतच प्रेक्षकांनाही दैनंदिन वैयक्तिक काळजीबाबत आपला विशेष दृष्टिकोन समजून सांगणे हा आहे.

फेमिना मिस इंडिया महाराष्ट्र 2027 च्या या सीझनमध्ये नोव्हेंबर 2026 ते जानेवारी 2027 या तीन महिन्यांच्या कालावधीत एकूण 10 कार्यक्रम आयोजित केले जाणार आहेत. यादरम्यान मुंबई आणि पुणे येथे ऑडिशनचे आयोजन केले जाईल.

या भागीदारीबाबत भाष्य करताना फिटकूच्या सह-संस्थापक नेहा मर्दा म्हणाल्या, "आपला आत्मविश्वास आपल्या त्वचेशी आणि व्यक्तिमत्त्वाशी सहज जोडलेला असतो. आम्हाला अभिमान आहे की आम्ही फेमिना मिस इंडिया महाराष्ट्राचा भाग आहोत, जे वैयक्तिक ओळख, आत्मविश्वास आणि महत्त्वाकांक्षेचा उत्सव साजरा करते." फिटकू चे सह-संस्थापक आणि सीईओ सुमित मर्दा म्हणाले, "फेमिना मिस इंडिया महाराष्ट्र 2027 सोबतच्या या जोडणीद्वारे, फिटकूला पर्सनल हायजीनला आत्मविश्वास, सेल्फ-केअर आणि दैनंदिन वेलनेसशी जोडलेल्या व्यापक चर्चेचा भाग बनवायचे आहे.

महात्मा फुले यांच्या जन्मद्विशताब्दी वर्षानिमित्त ओतूर येथे सत्यशोधक अधिवेशन

■ नारायणगाव (दै. संध्या)

महात्मा फुले यांनी सुरू केलेल्या ऐतिहासिक शाळेचा वारसा लाभलेल्या ओतूर (जि. पुणे) येथे सत्यशोधक भाऊ कोंडाजी डुंबरे पाटील प्रतिष्ठान (ओतूर) यांच्या वतीने महात्मा फुले यांच्या जन्मद्विशताब्दी वर्षानिमित्त राज्यव्यापी विशेष सत्यशोधक अधिवेशन - २०२६ चे आयोजन करण्यात आले आहे. हे अधिवेशन शनिवार, दि.२१ व रविवार दि.२२ नोव्हेंबर २०२६ रोजी सत्यशोधक नगरी (मार्केट यार्ड, ओतूर, ता.जुन्नर, जि.पुणे) येथे होणार आहे. अधिवेशनाचे उदघाटन ज्येष्ठ नेते शरदचंद्र पवार यांच्या हस्ते होणार असून अध्यक्ष म्हणून खासदार शाहू महाराज, कोल्हापूर उपस्थित राहणार आहेत. महात्मा जोतीराव फुले, ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आणि सत्यशोधक भाऊ कोंडाजी पाटील डुंबरे यांच्या प्रतिमांची मिरवणूक, अर्धपुतळ्यांचे अनावरण, कष्टकरी प्रतिनिधी स्त्री व पुरुष श्रमिकांचा सत्कार, सत्यशोधकांच्या विद्यमान वंशजांचा विशेष सत्कार, सत्यशोधक परिसंवाद सत्र, सांस्कृतिक कार्यक्रम, महानाट्य, लघुनाटिका सादरीकरण अशा अनेक कार्यक्रमांचे आयोजन या अधिवेशनादरम्यान करण्यात आले आहे.

शनिवार दि. २१ नोव्हेंबर रोजी सकाळी ९ ते १० महात्मा जोतीराव फुले, सावित्रीबाई फुले व भाऊ कोंडाजी डुंबरे पाटील यांच्या अर्धपुतळ्यांचे अनावरण होणार आहे. हा कार्यक्रम महात्मा फुले यांनी सुरू केलेल्या ऐतिहासिक वारसा असलेल्या जि. प. प्राथ. शाळा नं. २, ओतूर या मूळ शाळेत होणार आहे. यानंतर सत्यशोधक महात्मा जोतीराव फुले, ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आणि सत्यशोधक भाऊ कोंडाजी पाटील डुंबरे यांच्या प्रतिमांची मिरवणूक काढण्यात येणार असून सर्व मंडळी मिरवणुकीने मुख्य व्यासपीठ, सत्यशोधक नगरी मार्केट यार्ड येथे दाखल होतील.

या मिरवणुकीत लेझिम पथक, पथनाट्य सादर होतील. सकाळी ११ ते १ या वेळेत सत्यशोधक अधिवेशनाचा उद्घाटन सोहळा ज्येष्ठ नेते शरदचंद्र पवार यांच्या शुभहस्ते होणार असून अध्यक्ष म्हणून खासदार शाहू महाराज, कोल्हापूर असणार आहेत.

सरकारी आरोग्य योजनांमध्ये समावेश करण्यासाठी प्रयत्नशील

चंद्रकांत पाटील यांचे प्रतिपादन; इंडियन सोसायटी ऑफ डिजिटल डेन्टिस्ट्रीतर्फे अत्याधुनिक दंतोपचारावरील आंतरराष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन

■ पुणे (दै. संध्या)



" दंतोपचारांना सरकारी आरोग्य योजनांमध्ये समाविष्ट करण्यासाठी केंद्र व राज्य सरकारकडे पाठपुरावा करणार आहे. केंद्र सरकारची आयुष्यमान भारत योजना व राज्य सरकारच्या महात्मा ज्योतिबा फुले आरोग्य योजना आणि मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी यातून दंतोपचार मोफत किंवा सवलतीच्या दरात होतील, यासाठी प्रयत्नशील आहे," असे प्रतिपादन राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी केले.

इंडियन सोसायटी ऑफ डिजिटल डेन्टिस्ट्रीतर्फे (आयएसडीडी) अत्याधुनिक दंतचिकित्सा व दंतरोपण या विषयावरील तिसऱ्या आंतरराष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. बालेवाडी येथील हॉटेल ऑर्किड येथे झालेल्या कार्यक्रमावेळी मराठा चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज आणि ॲग्रीकल्चरचे (एमसीसीआयए) महासंचालक प्रशांत गिरबाने, 'आयएसडीडी'चे अध्यक्ष डॉ. रत्नदीप जाधव, संस्थापक अध्यक्ष डॉ. पंकज चिवटे, सचिव डॉ. विजय ताम्हाणे, संचालक व खजिनदार डॉ. कौस्तुभ पाटील, डॉ. विपीन माहूरकर आदी उपस्थित होते. या परिषदेमध्ये देश-विदेशातील ६०० ते ७०० दंतवैद्यक सहभागी झाले आहेत.

चंद्रकांत पाटील म्हणाले, "आजही भारतात दंतोपचार हे 'लक्झरी' उपचार मानले जातात, त्यामुळे ते न परवडणारा मोठा वर्ग आपल्या आजुबाजूला आहे. अशांसाठी दंतोपचार कमीत कमी खर्चात व्हावेत यासाठी आम्ही मागील बऱ्याच काळापासून प्रयत्नशील आहोत. सध्या आपल्याकडे 'एमएनजीएल'च्या माध्यमातून दोन मोबाईल व्हॅन कार्यरत असून त्याव्दारे आपण गरीब व गरजू रुग्णांना दंतोपचारांसह इतर आरोग्य सुविधा पुरवत आहोत. वस्ती भागातील नागरीकांना याचा चांगला फायदा होत असून येत्या काळात आपण ही सुविधा आणखी वाढविण्याचा प्रयत्न करणार आहोत." प्रशांत गिरबाने म्हणाले, गेल्या काही वर्षात भारताने तंत्रज्ञानाच्या माध्यमातून सर्वच क्षेत्रात वेगाने प्रगती केली आहे. यामध्ये डिजिटल हेल्थचाही सहभाग असून दंतोपचारांतील डिजिटल क्रांती वाखाणण्याजोगी आहे. येत्या काळात तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्ता यांचा वापर दंतवैद्यांसाठी प्रगतीचा मार्ग ठरेल. वैद्यक क्षेत्रात वाढलेल्या कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वापरामुळे आरोग्य सुविधा अधिक जलद, सोप्या व सहज होत आहेत. डिजिटल इंडियामुळे लाभार्थ्यांना थेट मदत मिळणे शक्य होत आहे. आरोग्य क्षेत्रात भारत आत्मनिर्भर व्हायचा असेल, तर आपल्याला अधिक प्रमाणात संशोधन, इनोव्हेशन करावे लागेल. या आंतरराष्ट्रीय परिषदेतून या कार्याला गती मिळत असून अजूनही मोठे काम व्हायला हवे.डॉ. रत्नदीप जाधव यांनी प्रास्ताविकात सांगितले की, या परिषदेच्या माध्यमातून डिजिटल डेन्टिस्ट्रीचा प्रचार व प्रसार करण्याचा उद्देश आहे.

'इंडसइंड निप्पॉन लाइफ'च्या संक्रमणाला एक वर्ष पूर्ण

वितरण, डिजिटल आणि प्रतिभाविकासाच्या बळावर वाढीच्या पुढील टप्प्याची तयारी

■ पुणे (दै. संध्या)

'इंडसइंड निप्पॉन लाइफ इन्शुरन्स कंपनी लिमिटेड'ने (आयएनएलआयसी) नव्या मालकीखाली आणि नव्या ओळखीने सुरू केलेल्या प्रवासाला एक वर्ष पूर्ण झाले आहे.'इंडसइंड इंटरनॅशनल होल्डिंग्ज लिमिटेड' (आयआयएचएल) आणि जपानमधील आघाडीची विमा कंपनी 'निप्पॉन लाइफ इन्शुरन्स' यांच्या मालकीखाली कंपनीने वितरण, डिजिटल तंत्रज्ञान आणि मनुष्यबळ या तीन प्रमुख क्षेत्रांवर भर देत वाढीचा पुढील टप्पा निश्चित केला आहे.

पूर्वी 'रिलायन्स निप्पॉन लाइफ इन्शुरन्स' या नावाने कार्यरत असलेल्या कंपनीने आर्थिक वर्ष २०२५-२६मध्ये व्यवस्थापनाखालील मालमत्तेचा (एयूएम) ४० हजार कोटी रुपयांचा टप्पा ओलांडला. नव्या व्यवसायाच्या प्रीमियममध्ये १८ टक्क्यांची वाढ झाली, तर कंपनीने २४८ कोटी रुपयांचा करपश्चात नफा नोंदवला. कंपनीने दावेनिपटारा प्रमाण ९८.९४ टक्के राखले. सॉल्व्हन्सी रेशो २१८ टक्के राहिला. हा नियामकाने निश्चित केलेल्या १५० टक्के किमान आवश्यकतेपेक्षा लक्षणीय अधिक आहे.


आर्थिक वर्ष २०२६-२७च्या पहिल्या सहामाहीत कंपनीच्या वैयक्तिक डब्ल्यूआरपीमध्ये १४ टक्क्यांची वाढ झाली. सप्टेंबर २०२६अखेर नव्या व्यवसायासह नूतनीकरणाचा एकूण प्रीमियम सुमारे २,८०० कोटी रुपये राहिला. कंपनीचा एयूएम ४२,४३५ कोटी रुपये, तर करपश्चात नफा ८७ कोटी रुपये नोंदवण्यात आला.या टप्प्याबाबत बोलताना कंपनीचे कार्यकारी संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष व्होरा म्हणाले, की 'गेल्या वर्षभरात नव्या संस्थात्मक भागीदारांच्या सामर्थ्याचे व्यावसायिक गतीत रूपांतर करण्यावर आमचा भर राहिला. वितरण, तंत्रज्ञान, प्रतिभाविकास आणि ग्राहक अनुभव या क्षेत्रांत आम्ही नियोजनबद्ध गुंतवणूक केली. त्याचबरोबर धोरणात्मक भागीदारी आणि आर्थिक पायाभूत स्थिती मजबूत केली.' 'भारतातील आघाडीची जीवन विमा संस्था उभारणे हे आमचे उद्दिष्ट आहे. शाश्वत वाढ साधणारी, ग्राहकांचा विश्वास संपादन करणारी आणि प्रत्येक कुटुंबाच्या आर्थिक तयारीचा भाग बनणारी संस्था उभारण्याच्या दिशेने आम्ही वाटचाल करत आहोत,' असेही त्यांनी सांगितले.



दैनिक संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक
रविवार, दि. २२ नोव्हेंबर २०२६

पुणे शहर व जिल्हा

www.dainikesandhya.com www.youtube.com/@sandhyalivenews



थोडक्यात पण महत्वाचे



निंबोडी येथील मतदार यादीतील दुबार नावे तात्काळ वगळण्याची मागणी

इंदापुर : दैनिक संध्या

इंदापूर विधानसभा मतदारसंघातील मौजे निंबोडी येथील मतदार यादी (भाग क्रमांक ८६) मध्ये मोठ्या प्रमाणावर दुबार नावे (Duplicate Entry) नोंदवली गेल्याचा प्रकार समोर आला आहे. निवडणूक प्रक्रिया पारदर्शक राहण्यासाठी आणि बोगस मतदान टाळण्यासाठी या यादीतील दुबार मतदारांची नावे तात्काळ वगळण्यात यावीत, अशी मागणी वंचित बहुजन आघाडीचे पुणे जिल्हा पूर्व अध्यक्ष ॲड. राज कुमार यांनी इंदापूरचे तहसीलदार तथा सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी जिवन बनसुडे यांच्याकडे केली आहे. या निवेदनात म्हटले आहे की, संबंधित यादीतील अनेक मतदार या गावातून कायमस्वरूपी स्थलांतरित झाले आहेत किंवा त्यांची नावे दोन ठिकाणी नोंदवली गेली आहेत. निवडणूक प्रक्रियेत पारदर्शकता आणण्यासाठी उपलब्ध पुराव्यांची आणि ईपीआयसी (EPIC) क्रमांकांची पडताळणी करून संबंधित मतदारांची नावे यादीतून तात्काळ कमी करावीत. निवेदनासोबत आवश्यक पुरावे आणि दुबार मतदारांची यादी प्रशासनाकडे सुपूर्द करण्यात आली आहे. यावेळी पुणे जिल्हा पूर्व जिल्हाध्यक्ष ॲड. राज कुमार यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी महासचिव सतीश साळवे, सचिव गोविंद कांबळे, कायदेशीर सल्लागार ॲड. संतोष कांबळे आणि इतर पदाधिकारी उपस्थित होते.

दारू पिऊन मारहाण करणाऱ्या पतीच्या त्रासाला कंटाळून पत्नीची आत्महत्या

जेजुरी : दैनिक संध्या

जेजुरी एमआयडीसी परिसरात दारू पिऊन मारहाण करणाऱ्या पतीच्या त्रासाला कंटाळून राहत्या घरात कौसल्या पवार या विवाहित महिलेने गळफास घेऊन आत्महत्या केली. या प्रकरणी महिलेच्या पतीविरुद्ध जेजुरी पोलीस ठाण्यात आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मुलगा पंकज ज्ञानसिंह राजपूत रा. जेजुरी एमआयडीसी, यांनी फिर्याद दिली आहे. दि.१८ रात्री १० वाजण्याच्या सुमारास वडील ज्ञानसिंह पुरणसिंह राजपूत यांनी दारू पिऊन घरी आल्यानंतर आईला मारहाण केली. या त्रासाला कंटाळून आईने गळफास घेतल्याचे तसेच वडिलांनी आईला आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा आरोप फिर्यादीने केला आहे. याप्रकरणी ज्ञानसिंह पुरणसिंह राजपूत (रा. जेजुरी एमआयडीसी, ता. पुरंदर, जि. पुणे, मूळ रा. आग्रा, उत्तर प्रदेश) यांच्याविरुद्ध जेजुरी पोलिस स्टेशन मध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जेजुरी पोलीस स्टेशन चे प्रभारी पोलीस निरीक्षक रवींद्र पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर उदार करीत आहेत.



पाण्याचा अपव्यय करणाऱ्या पाच नागरिकांचे नळजोड खंडित

आळंदी : दैनिक संध्या

पिण्याच्या पाण्याचा अनावश्यक वापर करून अपव्यय करणाऱ्या पाच नागरिकांविरुद्ध आळंदी नगरपरिषदेने कठोर कारवाई केली आहे. नगरपरिषदेच्या पाणीपुरवठा विभागाने २० नोव्हेंबर रोजी केलेल्या विशेष तपासणीत पाण्याचा अपव्यय होत असल्याचे आढळल्याने संबंधित पाच नागरिकांचे नळजोड खंडित करण्यात आले. तसेच प्रत्येकाकडून दोन हजार रुपये दंडात्मक शुल्क वसूल करण्यात येणार असल्याची माहिती मुख्याधिकारी माधव खांडेकर यांनी दिली. आळंदी नगरपरिषद हद्दीत पिण्याच्या पाण्याचा वापर काटकसरीने करण्याचे आवाहन प्रशासनाकडून वारंवार करण्यात येत आहे. काही नागरिकांकडून पाण्याचा अनावश्यक वापर होत असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे प्रशासनाने या प्रकारांची गंभीर दखल घेत प्रत्यक्ष तपासणी आणि कारवाईची मोहीम हाती घेतली आहे. पाण्याचा अपव्यय रोखण्यासाठी नगरपरिषदेकडून यापुढेही नियमित तपासणी करण्यात येणार आहे. पिण्याचे पाणी नळ सुरू ठेवून वाया घालविणे किंवा अनावश्यक वापर करणे आढळल्यास संबंधितांविरुद्ध नियमानुसार कठोर कारवाई केली जाईल, असा इशाराही प्रशासनाने दिला आहे. त्यामुळे नागरिकांनी पाण्याचा वापर आवश्यकतेनुसारच करून पाण्याचा प्रत्येक थेंब जपावा, असे आवाहन मुख्याधिकारी माधव खांडेकर यांनी केले आहे.

पाणी बचतीतून शेती विकासाचा नवा आदर्श

नारायणगाव : दैनिक संध्या

जलसंवर्धनातून शेती समृद्ध करण्याच्या उद्देशाने लुपिन फाउंडेशनच्या माध्यमातून जुन्नर तालुक्यातील नळवणे येथील 33 शेतकऱ्यांना ठिबक व तुषार सिंचन संचांचे वाटप करण्यात आले. पाण्याचा अपव्यय टाळून उपलब्ध जलसाठ्याचा काटकसरीने वापर करण्यासाठी हा उपक्रम राबविण्यात आला. नळवणे गावात मोरशेत व पळसठिका पाझर तलावांच्या माध्यमातून जलसाठा वाढविण्यासाठी विविध कामे करण्यात आली आहेत. या पाण्याचा शेतीसाठी योग्य वापर व्हावा, यासाठी शेतकऱ्यांना आधुनिक सिंचन साधने उपलब्ध करून देण्यात आली. ठिबक व तुषार सिंचनामुळे पाण्याची बचत होण्यासोबतच पिकांना गरजेनुसार पाणी देणे शक्य होणार आहे. त्यामुळे उत्पादन खर्च कमी करून शेती अधिक फायदेशीर करण्यास मदत होणार आहे. या उपक्रमासाठी लुपिन फाउंडेशनचे जिल्हा समन्वयक संदीप झणझणे, तालुका समन्वयक प्रताप मोठे, कार्यक्रम अधिकारी बाळासाहेब बोराडे व मच्छिंद्र खरात यांचे सहकार्य लाभले. जलसंवर्धन, लोकसहभाग आणि आधुनिक शेती तंत्रज्ञानाची सांगड घालून नळवणे गावाने शाश्वत शेतीच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल टाकले आहे. या उपक्रमामुळे शेतीला अधिक बळ मिळण्यास मदत होत असून, इतर गावांनाही जलसंवर्धनासाठी प्रेरणा मिळणार आहे.

लेण्याद्री येथे महाआरोग्य शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

ट्रस्टच्या वतीने मुख्यमंत्री सहाय्यता निधीस १ लाख ११ हजार १११ रुपये धनादेश प्रदान

■ नारायणगाव (दै. संध्या)

अष्टविनायक तिर्थक्षेत्रापैकी एक असलेले श्री क्षेत्र लेण्याद्री येथे श्री लेण्याद्री गणपती देवस्थान ट्रस्ट, गोळेगाव यांच्या वतीने तसेच मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष, पुणे आणि डिसेंट फाउंडेशन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवार, दि. २० नोव्हेंबर २०२६ रोजी भव्य महाआरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराच्या माध्यमातून एकुण २०८७ ग्रामीण भागातील गरीब, गरजू व आर्थिकदृष्ट्या दुर्बल रुग्णांना विविध आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या.

या शिबिराचे उद्घाटन विघ्नहर सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन सत्यशील शेरकर यांच्या हस्ते करण्यात आले तसेच मान्यवरांचे हस्ते गणेश पूजन व दीपप्रज्वलन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष, पुणेचे अध्यक्ष डॉ. मानसिंग साबळे होते. देवस्थान ट्रस्टचे वतीने आलेल्या सर्व मान्यवराचे, डॉक्टर, वैदयकीय अधिकारी, सहभागी हॉस्पिटल व संस्था यांचा सत्कार व सन्मान करण्यात आला. या शिबिराची विशेष बाब म्हणजे दुष्काळजन्य परिस्थितीत मदतकार्यासाठी श्री लेण्याद्री गणपती देवस्थान ट्रस्टच्या वतीने मुख्यमंत्री सहाय्यता निधीस रुपये १,११,१११/- (अक्षरी रुपये एक लाख अकरा हजार एकशे अकरा फक्त) इतक्या रकमेचा धनादेश डॉ.मानसिंग साबळे यांच्याकडे प्रदान करण्यात आला.

याप्रसंगी डॉ. मानसिंग साबळे, डॉ.अश्विनी कुळमेथे यांनी शिबिरास शुभेच्छा देत आलेल्या रुग्णांना विविध आजार व त्यावरील उपचारांबाबत मार्गदर्शन केले तसेच आरोग्यसेवेचे महत्त्व अधोरेखित करून देवस्थान ट्रस्टच्या सामाजिक उपक्रमांचे कौतुक केले. शिबिरास आलेल्या मान्यवराचे तसेच सहभागी हॉस्पिटल व संस्थांचे स्वागत देवस्थान ट्रस्टचे विश्वस्त जितेंद्र बिडवई यांनी केले तर देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष ॲड.संजय ढेकणे यांनी शिबिराचे प्रास्ताविकातून देवस्थान ट्रस्टच्या धार्मिक, सामाजिक व आरोग्यविषयक कार्याचा आढावा दिला तसेच धार्मिक कार्याबरोबरच सामाजिक संकटाच्या काळात मदतीचा हात पुढे करणे ही देवस्थान ट्रस्टची सामाजिक बांधिलकी असून त्याच भावनेतून हा निधी देण्यात आल्याचे प्रास्ताविकात स्पष्ट करण्यात आले. देवस्थान ट्रस्टचे सेक्रेटरी शंकर ताम्हाणे यांनी शिबिरास आलेल्या मान्यवरांचे तसेच सहभागी हॉस्पिटल व संस्थांचे आभार प्रदर्शन केले.



यावेळी विघ्नहर सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन मा. सत्यशील शेरकर, मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष, पुणेचे अध्यक्ष डॉ. मानसिंग साबळे, जुन्नर तालुका आरोग्य अधिकारी डॉ.अश्विनी कुळमेथे, जेष्ठ नागरिक संघ तालुका समन्वय समितीचे अध्यक्ष प्रा. डोंगरे सर, जुन्नर नगरपालिकेचे माजी नगरसेवक मा.भाऊ कुंभार, देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष ॲड. संजय ढेकणे, उपाध्यक्ष गोविंद मेहेर, सेक्रेटरी शंकर ताम्हाणे, खजिनदार भगवान हांडे, विश्वस्त मच्छिंद्र शेटे, सदाशिव ताम्हाणे, काशिनाथ लोखंडे, जयवंत डोके, जितेंद्र बिडवई, डिसेंट फाउंडेशनचे संस्थापक जितेंद्र बिडवई, सचिव डॉ.एफ.बी.आतार, संचालक आदिनाथ चव्हाण, डॉ.दयानंद गायकवाड, विविध रुग्णालयांचे डॉक्टर्स व वैद्यकीय अधिकारी तसेच मोठ्या संख्येने जुन्नर तालुक्यातील ग्रामस्थ व रुग्ण उपस्थित होते.

या शिबिरामध्ये मोफत नेत्र तपासणी, मोतीबिंदू शस्त्रक्रिया, हृदयरोग व मूत्ररोग तपासणी, कर्करोग पूर्वतपासणी व जनजागृती, हाडांचे व सांध्यांचे आजार, मेंदू व मणक्याचे आजार, कान-नाक-घसा तपासणी, दंत तपासणी, बालरोग, त्वचारोग, बी.पी. व शुगर तपासणी अशा विविध आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या. याशिवाय आयुर्वेदिक उपचार, व्यायाम मार्गदर्शन, आवश्यकतेनुसार रुग्णांना मोफत चष्मे व औषध वाटप, गरजू रुग्णांना श्रवणयंत्र वाटप तसेच दिव्यांग व्यक्तींना आवश्यक साहित्य उपलब्ध करून देण्यासाठी तपासणी व नोंदणीची सुविधा करण्यात आली. ७० वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांसाठी आयुष्मान वय वंदना योजनेंतर्गत पाच लाख रुपयांपर्यंतच्या आरोग्य उपचार सुविधेचा लाभ मिळवून देण्यासाठी आवश्यक मार्गदर्शन व मोफत नावनोंदणीची सुविधा करण्यात आली होती. या उपक्रमात विविध नामांकित रुग्णालये, वैद्यकीय संस्था, तज्ञ डॉक्टर्स व सेवाभावी संस्थांनी सहभाग घेतला. अशी माहीती देवस्थानचे अध्यक्ष ॲड. संजय ढेकणे व सचिव शंकर ताम्हाणे यांनी दिली.

संत शिरोमणी नामदेव महाराज' यांच्या जयंतीनिमित्त व 'कार्तिक एकादशी' निमित्त भक्तिमय वातावरणात "भव्य दिंडी" संपन्न

■ पुणे (दै. संध्या)

भक्तीला समाज जागृतीचे, कीर्तनाला लोकप्रबोधनाचे माध्यम बनवणारे संत शिरोमणी श्री नामदेव महाराज यांच्या ७५६ व्या जयंतीनिमित्त व कार्तिक एकादशी निमित्त वेदांत सांस्कृतिक मंच व वारकरी संप्रदाय तर्फे कर्वेनगर येथे दिंडी काढण्यात आली होती.

भैरवनाथ विठ्ठल मंदिर पासून सुरू झालेल्या या पालखी- दिंडीमध्ये कर्वेनगर येथीलनागरिक महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. कमिन्स महाविद्यालय,शाहू मित्र मंडळ, सिद्धिविनायक महाविद्यालय, सुवर्णरत्न सोसायटी, ज्ञानदीप कॉलनी, स्पेंसर चौक, श्रीमान सोसायटी मार्गे ही दिंडी कर्वेनगर येथील पालवबाबा विठ्ठल मंदिरात पोहोचली.तेथे हभप चंद्रकांत वांजळे महाराज ह्यांचे कीर्तन झाले. दिंडी मध्ये महिला आपल्या डोक्यावर तुलशी वृंदावन घेऊन होत्या तर वात्सल्य पाळणाघरचे बाल कलाकार निवृत्ती, ज्ञानदेव, सोपान, मुक्ताबाई, जनाबाई, चांगदेव, तुकाराम यांच्या वेशभूषेत दिंडी मध्ये उत्साहात सहभागी झाले होते. "वेदांत सांस्कृतिक मंच"चे स्वयंसेवक,वारकरी संप्रदायचे वारकरी, हॅपी थॉट्स, तेज ज्ञान फाऊंडेशनचे स्वयंसेवक, विष्णूनाद शंखवादन मंडळ, भैरवनाथ भजनी मंडळ चे कार्यकर्ते तसेच महिला नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.टाळ मृदुंग च्या मधुर आवाजामध्ये वारकरी, नागरिक देह



-भान विसरून दिंडी च्या आनंदात सहभागी झाले होते. नागरिकांनी विविध ठिकाणी रांगोळ्या काढून तसेच पुष्पवृष्टी करून दिंडीचे स्वागत केले. "भक्ती ही कोणत्याही एका जातीची धर्माची किंवा वर्गाची मक्तेदारी नसून ती प्रत्येक माणसासाठी आहे हा विचार संत शिरोमणी श्री नामदेव महाराज यांनी दिला. संत नामदेव महाराज केवळ विठ्ठलाचे भक्त नव्हते तर भक्तीच्या मार्गातून समाजाला जोडणारे महान संत होते. म्हणून शेकडो वर्षापासूनचे त्यांचे विचार समाजाला भक्ती,समता आणि माणुसकीचा मार्ग दाखवत आहे" अशी भावना वेदांत सांस्कृतिक मंच चे विनायक बेहेरे यांनी यावेळी बोलून दाखवली.

यावेळी हभप चंद्रकांत वांजळे महाराज, वेदांत सांस्कृतिक मंचचे कार्यकर्ते, पालवबाबा विठ्ठल मंदिरात काकड आरतीचे संचालक पोपटराव फेंगसे, काकड आरतीचे प्रमुख विजय अप्पा बराटे, विजय महाराज भिसे, दासबोधाचे अभ्यासक सुहास विटेकर, 'सामाजिक समरसता'चे रवि ननावरे तसेच स्थानिक नगरसेवक, सामाजिक कार्यकर्ते यांची मुख्य उपस्थिती होती. साबुदाण्याची खिचडी प्रसाद वाटप होऊन दिंडीची सांगता झाली.

आंतरमहाविद्यालयीन बॉल बॅडमिंटन स्पर्धेत साबळे फार्मसी महाविद्यालयाचा तृतीय क्रमांक

■ सासवड (दै. संध्या)

पुणे जिल्हा शिक्षण मंडळ संचलित शेठ गोविंद रघुनाथ साबळे कॉलेज ऑफ फार्मसी, सासवड येथील विद्यार्थ्यांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांच्या आंतरमहाविद्यालयीन बॉल बॅडमिंटन स्पर्धेत तृतीय क्रमांक पटकावून यश संपादन केले. ही स्पर्धा १९ नोव्हेंबर रोजी पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे वाघिरे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, सासवड आणि पुणे जिल्हा विभागीय क्रीडा समिती यांच्या संयुक्त विद्यमाने पार पडली. या स्पर्धेत महाविद्यालयाच्या खेळाडूंनी नेत्रदीपक खेळाचे प्रदर्शन करत जिद्द, चिकाटी, शिस्त आणि सांघिक भावनेच्या जोरावर तृतीय क्रमांकावर मोहोर उमटवली. विद्यार्थ्यांच्या या उल्लेखनीय कामगिरीमुळे महाविद्यालयाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.

खेळाडूंच्या या यशामागे महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. राजश्री चव्हाण यांचे मोलाचे मार्गदर्शन व प्रोत्साहन लाभले. तसेच क्रीडा विभागप्रमुख सुमित मुसळे यांनी खेळाडूंना वेळोवेळी योग्य मार्गदर्शन व सहकार्य केले.

विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल महाविद्यालयाच्या प्राचार्या, सर्व प्राध्यापकवृंद आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विजयी संघाचे मनःपूर्वक अभिनंदन केले असून भविष्यातील क्रीडा स्पर्धांसाठी पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.



नाशिक जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी आयोजित पाच दिवसीय राज्यांतर्गत शेतकरी प्रशिक्षण कार्यक्रम उत्साहात संपन्न

■ बारामती (दै. संध्या)

महाराष्ट्र शासन,कृषी विभाग व कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा), नाशिक यांच्या वतीने तसेच एग्रीकल्चर डेव्हलपमेंट ट्रस्ट,कृषी विज्ञान केंद्र,बारामती,जि.पुणे यांच्या सहकार्याने दिनांक १७ ते २१ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आलेला पाच दिवसीय राज्यांतर्गत शेतकरी प्रशिक्षण कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात यशस्वीरीत्या संपन्न झाला.

या प्रशिक्षणामध्ये नाशिक जिल्ह्यातील सटाणा,मालेगाव, नांदगाव व देवळा तालुक्यांतील शेतकरी बांधवांनी सहभाग नोंदविला.आधुनिक कृषी तंत्रज्ञानाची माहिती प्रत्यक्ष प्रात्यक्षिके,तज्ज्ञांचे मार्गदर्शन, संस्थांना भेटी व शेतकरी उत्पादक कंपन्यांच्या कामकाजाची पाहणी या माध्यमातून देण्यात आली.

कृषी विज्ञान केंद्र,बारामती येथील वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख डॉ.धीरज शिंदे,प्रशिक्षण समन्वयक श्री. सुभाष रणदिवे,श्री.गणेश शिंदे तसेच विषय विशेषज्ञ श्री.संतोष गोडसे व इतर तज्ज्ञांनी विविध सत्रांमध्ये आधुनिक कृषी तंत्रज्ञान, फळपीक लागवड,केळी,कांदा, मका व भाजीपाला उत्पादन तंत्रज्ञान,नैसर्गिक शेती निविष्ठा, जमिनीचे आरोग्य,सेंद्रिय कर्बाचे महत्त्व,कीड व रोग व्यवस्थापन याबाबत मार्गदर्शन केले.



श्री. महेश लोंढे, CBBO टीम यांनी शेतकरी उत्पादक कंपनीची स्थापना,व्यवस्थापन,सामूहिक खरेदी-विक्री,शेतमाल निर्यात व विपणन व्यवस्थापन याबाबत माहिती दिली.तसेच श्री.समाधान खूपसे, SLTI समन्वयक यांनी प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजना (PMFME) अंतर्गत उपलब्ध संधी,प्रक्रिया उद्योग, यंत्रसामग्री, पॅकिंग, ब्रँडिंग व अनुदानविषयक तरतुदी याबाबत मार्गदर्शन केले. शेतमालापासून जॅम, जेली, ज्यूस, पावडर, डाळी, पीठ, तेल व विविध मूल्यवर्धित उत्पादने तयार करण्याच्या संधींची माहिती देण्यात आली.

दिनांक १९ नोव्हेंबर रोजी प्रशिक्षणार्थी शेतकऱ्यांनी ICAR-NIASM या संस्थेस भेट दिली. श्री. रवि कुमार यांनी हवामान बदल, दुष्काळ, वाढते तापमान, क्षारयुक्त जमीन, पाणीटंचाई व हवामान अनुकूल शेती तंत्रज्ञान याविषयी मार्गदर्शन केले. संस्थेच्या प्रक्षेत्रावर केशर आंबा, न्यूसेलर मोसंबी, द्राक्षे, ड्रॅगन फ्रूट व इतर फळपिकांच्या लागवड तंत्रज्ञानाची प्रत्यक्ष माहिती देण्यात आली. शेतकरी उत्पादक कंपनीचे संचालक श्री. वैभव पाटील व प्रतिनिधींनी कंपनीचे कामकाज, कृषी निविष्ठा केंद्र, धान्य प्रतवारी केंद्र, शेतमाल संकलन, सामूहिक विक्री व विपणन व्यवस्थापन याबाबत प्रत्यक्ष माहिती दिली.

श्री. विजय मदने यांनी फळपिकांची कलमे, दर्जेदार रोपांची निर्मिती, नर्सरी व्यवस्थापन, प्रो-ट्रे तंत्रज्ञान, शेडनेट व पॉलीहाऊस तंत्रज्ञान याबाबत मार्गदर्शन केले. शेतकऱ्यांनी गावठी कुक्कुटपालन, शेळीपालन, मेंढीपालन, गांडूळ खत निर्मिती, बायोफ्लॉक मत्स्यपालन, हायड्रोपोनिक्स व मधमाशीपालन प्रकल्पांची पाहणी केली. श्री. चंद्रकांत दाते, प्रकल्प व्यवस्थापक – हायड्रोपोनिक्स तंत्रज्ञान व श्री. गणेश शिंदे यांनी विविध प्रकल्पांची माहिती दिली.

दिनांक २१ नोव्हेंबर रोजी उद्यान पंडित पुरस्कार प्राप्त प्रगतिशील शेतकरी श्री. अशोक तावरे यांनी डाळिंब लागवड तंत्रज्ञान, पाणी व्यवस्थापन, एकात्मिक कीड व रोग व्यवस्थापन, पीक निरीक्षण व उत्पादन व्यवस्थापन याविषयी मार्गदर्शन करून शेतकऱ्यांच्या शंकांचे निरसन केले.

समारोपप्रसंगी श्री. सुभाष रणदिवे, प्रशिक्षण समन्वयक व श्री. संतोष गोडसे, विषय विशेषज्ञ – कृषी विस्तार यांनी विविध पिकांतील अडचणी, त्यावरील उपाययोजना, AI तंत्रज्ञानाचा वापर व कृषी क्षेत्रातील नवीन संधी याविषयी मार्गदर्शन केले. यावेळी सहभागी शेतकऱ्यांना प्रशिक्षण पूर्णत्वाची प्रमाणपत्रे वितरित करण्यात आली.

समारोपप्रसंगी श्री. बाळासाहेब महाजन (श्रीरामनगर, ता. नांदगाव), श्री. महेश अहिरराव (सौंदाणे, ता. मालेगाव), श्री. महेंद्र देवरे (बोराळे, ता. नांदगाव) व श्री. रवींद्र पगार (रामेश्वर, ता. देवळा) यांनी प्रशिक्षणाबाबत आपले मनोगत व्यक्त केले. प्रशिक्षणातून मिळालेले आधुनिक तंत्रज्ञान व ज्ञान आपल्या शेतावर अवलंबण्याचा तसेच इतर शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्याचा मनोदय त्यांनी व्यक्त केला.

या पाच दिवसीय प्रशिक्षणामुळे नाशिक जिल्ह्यातील शेतकऱ्यांना आधुनिक फळपीक लागवड, हवामान अनुकूल शेती, कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित तंत्रज्ञान, काढणी पश्चात व्यवस्थापन, प्रक्रिया उद्योग, मूल्यवर्धन, पॅकिंग, ब्रँडिंग, निर्यात, दुग्धव्यवसाय व कृषीपूरक व्यवसाय याबाबत प्रत्यक्ष व उपयुक्त ज्ञान मिळाले.

प्रशिक्षणार्थी शेतकऱ्यांनी सर्व संस्थांच्या अधिकारी व तज्ज्ञांच्या सूचनांचे पालन करून प्रशिक्षणात शिस्तबद्ध व उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. प्रशिक्षणातून मिळालेले ज्ञान प्रत्यक्ष शेतीमध्ये वापरून आपल्या गावातील इतर शेतकऱ्यांपर्यंत आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रसार करावा, असे आवाहन आत्माच्या वतीने करण्यात आले.

शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविणे, आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रसार करणे व शेतीला अधिक फायदेशीर बनविणे हा या प्रशिक्षणाचा मुख्य उद्देश यशस्वीरीत्या साध्य झाला.